रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १९ ◆ अंक ६८
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ गुरुवार, २४ सप्टेंबर २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग
‘थॅलेसेमिया प्रतिबंधासाठी जनजागृतीवर भर द्यावा’ / २
सेवा संकल्प अभियान : जनमनाचे समाधान / ४
‘संकटकाळात शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी’ / ६

## चार अपर जिल्हाधिकारी, ४७ अपर तहसीलदार कार्यालयांची निर्मिती

**मुंबई :** ग्रामीण जनतेला शासकीय सुविधा सहज मिळाव्यात, महसुली सेवांचा लाभ जलद गतीने व्हावा तसेच प्रशासकीय कामकाज अधिक गतिमान व्हावे यासाठी राज्यात ४७ नवीन अपर तहसीलदार कार्यालये सुरू करण्यात येणार आहेत. त्याचबरोबर चार नवीन अपर जिल्हाधिकारी कार्यालयेही स्थापन केली जाणार आहेत, अशी माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी बुधवारी (दि.२३) दिली. पुणे जिल्ह्यातील बारामती, सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर, रत्नागिरी जिल्ह्यातील दापोली आणि नागपूर जिल्ह्यातील नागपूर (ग्रामीण) अशी नवीन अपर जिल्हाधिकारी कार्यालयांची निर्मिती होणार आहे, तर २१ जिल्ह्यांत ४७ नवीन अप्पर तहसील कार्यालयांची निर्मितीदेखील करण्यात येणार आहे. प्रशासकीय विकेंद्रीकरणाला गती देण्यासाठी घेण्यात आलेल्या या निर्णयामुळे राज्यातील ग्रामीण भागातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.



पनवेल : स्वराज्य सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचा बाप्पा अर्थात मिरची गल्लीचा राजा.

# शेतकऱ्यांना सरसकट मदत देणार -मुख्यमंत्री

### शेताच्या बांधावर जाऊन पीक परिस्थितीची पाहणी



**लातूर : प्रतिनिधी**

राज्यातील दुष्काळाची परिस्थिती शासनाने अतिशय गांभीर्याने घेतली आहे. पावसाअभावी पिकांचे सरसकट नुकसान झाल्याचे दिसत असून राज्य शासनही शेतकऱ्यांना सरसकट मदत करेल. या संकटकाळात शेतकऱ्यांना एकटे न सोडता शासन पूर्ण ताकदीने त्यांच्या पाठीशी उभे राहून आवश्यक ती सर्व मदत करेल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी (दि.२३) दिली. ते प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

पीक परिस्थितीच्या पाहणीसाठी मुख्यमंत्री फडणवीस यांच्या दौऱ्याला लातूर येथून सुरुवात झाली. यावेळी त्यांनी लातूर जिल्ह्यातील जाऊ आणि खरोसा येथे शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन खरीप पिकांच्या नुकसानीची पाहणी केली व शेतकऱ्यांशी थेट संवाद साधला. ते म्हणाले, लातूर आणि धाराशिव जिल्ह्यांत यंदा केवळ ५० टक्के पाऊस पडल्याने खरीप हंगामातील सोयाबीनसह संपूर्ण पिके जळून खाक झाली आहेत. पाण्याच्या कमतरतेमुळे जलाशये कोरडी पडली असून पिण्याच्या पाण्यासह जनावरांच्या चाऱ्याचा प्रश्न अत्यंत बिकट बनला आहे. सुपर अलनिनोमुळे परिस्थिती बिकट बनली असली तरी सरकार शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत करण्यास कटिबद्ध आहे.

नियम आणि कायद्यानुसार प्रशासनाला नुकसानीचे पंचनामे करावेच लागतात, परंतु प्रत्यक्षात शेतकऱ्यांना मदत देताना ती सरसकटच केली जाईल. दुष्काळ निवारणासाठी शासन निधीची कोणतीही कमतरता भासू देणार नाही, असे सांगून शेतकऱ्यांच्या मागण्यांची दखल घेत मुख्यमंत्र्यांनी प्रशासकीय प्रक्रियेला गती देण्याचे आदेश दिले.

शेतकऱ्यांचे अश्रू पुसणे हे सरकारचे पहिले कर्तव्य आहे. बाधित शेतकऱ्यांना थेट आर्थिक मदत, पिण्याचे पाणी आणि पुढील रब्बी हंगामासाठी बियाणे-खतांचे नियोजन केले जाईल. आम्ही एनडीआरएफच्या नियमानुसार केंद्राकडे निधीची मागणी नक्की करू; मात्र केंद्राचा निधी येईपर्यंत शेतकरी बांधवांना थांबवून ठेवले जाणार नाही. राज्य सरकार स्वतःच्या तिजोरीतून तातडीने मदत सुरू करेल, असे मुख्यमंत्र्यांनी स्पष्ट केले.

या पाहणी दौऱ्यात सहकारमंत्री बाबासाहेब पाटील, पालकमंत्री शिवेंद्रराजे भोसले, खासदार ओमराजे निंबाळकर, आमदार बसवराज पाटील, संभाजी पाटील-निलंगेकर, संजय बनसोडे, अभिमन्यू पवार यांच्यासह इतर लोकप्रतिनिधी आणि मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

### बळीराजाला दिला धीर

*मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी दुष्काळग्रस्त मराठवाड्याचा दौरा केला. निलंगा तालुक्यातील जाऊ येथे मुख्यमंत्र्यांना पीक नुकसानीची माहिती देताना नूर पटेल हे शेतकरी भावूक झाले. वाळलेली पिके पाहून त्यांना हुंदका अनावर झाला. यावेळी मुख्यमंत्र्यांनी त्यांचा हात हातात घेऊन घाबरू नका, राज्य शासन या संकटात पूर्णपणे तुमच्यासोबत आहे. सर्वतोपरी मदत केली जाईल, असा धीर देत दिलासा दिला तसेच या ठिकाणी उपस्थित महिला शेतकऱ्यांशीही मुख्यमंत्र्यांनी संवाद साधला.*

## भाजप महाराष्ट्र प्रभारीपदी बैजयंत पांडा यांची नियुक्ती



**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष नितीन नबीन यांनी प्रदेश प्रभारी आणि सहप्रभारी पदांच्या नियुक्त्या जाहीर केल्या आहेत. यामध्ये महाराष्ट्र प्रभारीपदी बैजयंत जय पांडा यांची, तर सहप्रभारीपदी अमित मालवीय, सदानंद तानावडे, कमलजीत सहरावत यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

भाजप नेतृत्वाने महाराष्ट्रातील काही नेत्यांवर संघटनात्मक पातळीवर मोठ्या जबाबदाऱ्या दिल्या आहेत. त्यानुसार उत्तर प्रदेशच्या प्रभारीपदी विनोद तावडे आणि सहप्रभारीपदी मेधा कुलकर्णी यांची नियुक्ती करण्यात आली आहे. विनय सहस्त्रबुद्धे हे दिल्ली प्रभारी म्हणून काम पाहणार आहेत. भागवत कराड यांच्यावर मिझोरामच्या प्रभारीपदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे, तर डॉ. भारती पवार यांना गोवा राज्याच्या प्रभारीपदी नियुक्त करण्यात आले आहे.

# न्हावे ग्रामस्थांच्या बेमुदत संपाला यश

## कपात केलेल्या १७ कामगारांना पुन्हा सेवेत घेण्याचे ओएनजीसीचे आश्वासन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

ओएनजीसी प्रशासनाने १७ स्थानिक कामगारांना तडकाफडकी कामावरून कमी केल्याच्या निषेधार्थ पनवेल तालुक्यातील न्हावे ग्रामस्थांनी बेमुदत संप पुकारला होता. ग्रामसुधारक मंडळाच्या नेतृत्वाखाली सुरू असलेल्या या आंदोलनाला यश आले असून कपात केलेल्या कामगारांना पुन्हा सेवेत घेण्याचे आश्वासन ओएनजीसी प्रशासनाने दिले. त्यामुळे संप मागे घेण्यात आला आहे.





स्थानिक कामगारांना कामावरून काढून टाकल्याने ओएनजीसी प्रशासनाविरोधात आक्रमक भूमिका घेत न्हावे ग्रामस्थांनी १६ सप्टेंबरपासून बेमुदत संपाची हाक दिली होती. कामगार कपातीचा निर्णय तत्काळ मागे घेण्यात यावा आणि स्थानिकांना रोजगाराचा न्याय मिळावा, अशी प्रमुख मागणी आंदोलकांनी लावून धरली. आंदोलनात कामगारांसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

दरम्यान, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी यांनी मंगळवारी आंदोलनस्थळी भेट दिली होती. त्यांनी आंदोलनकर्त्यांशी संवाद साधत समस्या जाणून घेतल्या तसेच कामगारांचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी संबंधित प्रशासनाशी सकारात्मक चर्चा करण्यात येईल, असे आश्वासन दिले.

यावेळी जिल्हा परिषद सदस्य निकिता खारकर, पंचायत समिती सदस्य वितेश म्हात्रे, जिज्ञासा कोळी, निलेश खारकर, धीरज ओवळेकर यांच्यासह न्हावे गावातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अखेर या सामूहिक लढ्याला यश आले आहे. ओएनजीसी प्रशासनाने कपात केलेल्या कामगारांना येत्या १ ऑक्टोबरपासून पुन्हा सेवेत घेण्याचे आश्वासन मंगळवारी दिले. त्यामुळे ग्रामस्थांच्या एकजुटीचा विजय झाला असून कामगारांवर आलेले संकट गणरायाच्या कृपेने टळले आहे. कामगारांना धीर देण्यासाठी आलेल्या सर्वांचे न्हावे ग्रामसुधारणा मंडळाने आभार मानले आहेत.

## निवडक

### देशातील सरकारी बँका येत्या रविवारी राहणार सुरू

**नवी दिल्ली :** बँक कर्मचारी संघटनांनी २८ ते ३० सप्टेंबरदरम्यान तीन दिवसांच्या देशव्यापी संपाची हाक दिली आहे. या पार्श्वभूमीवर ग्राहकांना सलग अनेक दिवस बँकिंग सेवांपासून दूर राहावे लागू नये यासाठी येत्या रविवारी (दि.२७) सुट्टीच्या दिवशीही सर्व सार्वजनिक क्षेत्रातील बँका आणि प्रादेशिक ग्रामीण बँका सुरू ठेवण्याचे निर्देश केंद्रीय वित्त मंत्रालयाने दिले आहेत. वित्त मंत्रालयाच्या निर्णयाला भारतीय रिझर्व्ह बँकेनेदेखील सहमती दर्शविली आहे.

### वेटलिफ्टर मीराबाई चानूने रौप्यपदकासह रचला इतिहास

**आयची-नागोया :** भारताची दिग्गज वेटलिफ्टर मीराबाई चानू हिने आशियाई क्रीडा स्पर्धेत रौप्यपदक जिंकले. या रौप्यपदकासह तिने ऑलिम्पिक, आशियाई क्रीडा स्पर्धा आणि राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा या तिन्ही प्रमुख स्पर्धांमध्ये पदक जिंकण्याचा पराक्रम केला तसेच आशियाई क्रीडा स्पर्धेतील वेटलिफ्टिंग पदकासाठी भारताचा २८ वर्षांचा दुष्काळही संपवला आहे.

## अवैध मद्यविक्रीविरोधात विशेष मोहीम

■ २८ आरोपी अटकेत, नऊ लाखांचा मुद्देमाल जप्त

**अलिबाग : प्रतिनिधी**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर तसेच उत्सव काळात जिल्ह्यात अवैध मद्यविक्री आणि हातभट्टी दारूला आळा घालण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाने विशेष मोहीम राबवली. १४ ते २० सप्टेंबर या सात दिवसांच्या कालावधीत जिल्हाभरात ४५ गुन्हे दाखल करत २८ आरोपींना अटक करण्यात आली. या कारवाईत तब्बल नऊ लाख सात हजार ८६५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला गेला आहे.

गणेशोत्सवात मोठ्या प्रमाणात भाविकांची ये-जा, सार्वजनिक मंडळांचे कार्यक्रम आणि विविध ठिकाणी होणाऱ्या उत्सवांच्या पार्श्वभूमीवर अवैध मद्यविक्रीला आळा घालण्यासाठी उत्पादन शुल्क विभागाने जिल्ह्यात विशेष लक्ष केंद्रित केले होते. हातभट्टी दारू निर्मितीची ठिकाणे, अवैध मद्यविक्री केंद्र तसेच मद्याची बेकायदेशीर वाहतूक करणाऱ्यांवर पथकांकडून कारवाई करण्यात आली.

या मोहिमेत ४२२ लिटर गावठी दारू आणि तब्बल १४ हजार ६०० लिटर रसायन जप्त करण्यात आले. याशिवाय ५९.५८ बल्क लिटर देशी मद्य आणि ६०.१८ बल्क लिटर विदेशी मद्यही जप्त करण्यात आले आहे. अवैध मद्य वाहतुकीसाठी वापरण्यात येणारे एक वाहनही विभागाने ताब्यात घेतले.

गणेशोत्सव काळात अवैध मद्यविक्री रोखण्यासाठी विभागाकडून विशेष पथकांच्या माध्यमातून तपासणी आणि कारवाई करण्यात आली. उत्सवाच्या काळात बेकायदेशीर मद्यनिर्मिती, विक्री आणि वाहतूक होऊ नये यासाठी अशा कारवाया पुढेही सुरू राहणार असल्याचे विभागाकडून सांगण्यात आले आहे.

दरम्यान, रायगडात बनावट मद्य, शासनाचा कर किंवा उत्पादन शुल्क चुकवून होणारी मद्यविक्री तसेच हातभट्टी दारूची निर्मिती, वाहतूक किंवा विक्री याबाबत नागरिकांकडे माहिती असल्यास त्यांनी राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या १८०० २३३ ९९९९ या टोल-फ्री क्रमांकावर माहिती द्यावी. माहिती देणाऱ्या व्यक्तीचे नाव आणि ओळख पूर्णपणे गोपनीय ठेवण्यात येणार असल्याचे विभागाने स्पष्ट केले आहे.

## आश्रमशाळांचे थर्ड पार्टी ऑडिट


**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील १०० टक्के अनुदानित आदिवासी आश्रमशाळांच्या कारभाराची थर्ड पार्टी ऑडिटच्या माध्यमातून तपासणी करण्यात येणार असल्याची घोषणा आदिवासी विकासमंत्री डॉ. अशोक उईके यांनी बुधवारी (दि.२३) केली. राज्यात ५५८ अनुदानित आश्रमशाळा असून त्यापैकी ८० टक्क्यांहून अधिक काँग्रेस नेते व पदाधिकाऱ्यांशी संबंधित असल्याचा दावाही त्यांनी केला.

काँग्रेस पदाधिकाऱ्यांच्या आश्रमशाळा वगळून पाहणी केली तर त्यावर राजकारणाचा आरोप होऊ शकतो. त्यामुळे १०० टक्के अनुदान घेणाऱ्या सर्व आश्रमशाळांचे थर्ड पार्टी ऑडिट आदिवासी विकास विभागाकडून सुरू करण्यात आले आहे, असे ना. उईके यांनी सांगितले. या तपासणीमुळे संबंधित संस्थांच्या कारभारातील त्रुटी व अनियमितता समोर येण्याची शक्यता आहे.

## ५ ऑक्टोबरपासून मान्सूनचा परतीचा प्रवास

**पुणे :** महाराष्ट्रातून नैर्ऋत्य मान्सूनचा परतीचा प्रवास साधारणपणे ५ ऑक्टोबरच्या सुमारास सुरू होण्याची शक्यता आहे, तर १० ऑक्टोबरपर्यंत मान्सून राज्यातील बहुतांश भागांतून माघार घेईल, असे हवामान विभागाने म्हटले आहे. दरम्यान, यंदाच्या मान्सूनच्या हंगामात राज्यात सध्या १७ टक्के पावसाची तूट नोंदवण्यात आली आहे, तर संपूर्ण देशाचा विचार केल्यास सरासरीपेक्षा १५ टक्के कमी पाऊस झाला आहे. भारतीय हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार काही भागांत पावसाची साप्ताहिक तूट असली तरी मोसमी एकूण पाऊस समाधानकारक आहे.




## बोरघाट झाला सेफ्टी झोन!



**खालापूर : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील बोरघाटात अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी पोलिसांनी केलेल्या प्रतिबंधात्मक उपाययोजनांचा सकारात्मक परिणाम समोर आला आहे. बोरघाट पोलीस केंद्राच्या हद्दीत १०० दिवसांचा मृत्यूविरहित कालावधी नोंदविला गेला आहे. मिसिंग लिंक सुरू झाल्यापासून बोरघाटातील वाहतूक कोंडी इतिहासजमा झाली असून अपघातही कमी होत मृत्यूचा आकडा शून्यावर आला आहे.

अपघात होऊ नयेत यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर महामार्ग पोलिसांनी विशेष लक्ष दिले आहे. धोकादायक आणि संवेदनशील ठिकाणे निश्चित करून आवश्यक त्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत. वाहनचालकांना संभाव्य धोक्यांच्या ठिकाणी सूचना व सावधानतेचे फलक लावणे, महत्त्वाच्या ठिकाणी फिक्स पॉइंट निश्चित करून वाहतूक नियमन करणे, ब्लॅकस्पॉटवर वाहनचालकांना सतर्क करणे याकडे लक्ष देण्यात येत आहे.

### १०० दिवसांत एकही मृत्यू नाही

रात्रगस्त आणि पेट्रोलिंगवर भर देत वाहतूक सुरळीत आणि सुरक्षित करणे, वाहनांची तपासणी, नियमभंग करणाऱ्यांवर लक्ष आणि संभाव्य अडथळ्यांबाबत यंत्रणा सतर्क आहे. अपघात किंवा वाहतुकीस अडथळा झाल्यास तत्काळ मदत, वाहतूक सुरळीत करण्यासाठी उपाययोजना, प्रबोधन आणि कारवाईचा समतोल साधण्यात येत आहे. वेगमर्यादेचे पालन, सुरक्षित अंतर, धोकादायक ओव्हरटेक टाळणे, मद्यपान करून वाहन न चालविणे, मोबाइलचा वापर टाळणे आणि सीट बेल्टचा वापर याबाबत वाहनचालकांना सातत्याने मार्गदर्शन केले जात आहे. त्याचवेळी वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर मोटार वाहन कायद्यानुसार कारवाई करण्यात येत आहे.

## भजनी मंडळांना अनुदान योजना



**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील लोककलावंतांना प्रोत्साहन देण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या अनुदान पॅकेज अंतर्गत भजनी मंडळांना अनुदान देण्याचा निर्णय सांस्कृतिक कार्य विभागाने घेतला आहे. सन २०२६-२७ या आर्थिक वर्षासाठी समारे दोन हजार भजनी मंडळांकडून ऑनलाइन अर्ज मागविण्यात आले आहेत, अशी घोषणा सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी बुधवारी (दि.२३) केली.

महाराष्ट्रातील पात्र भजनी मंडळांना या योजनेचा लाभ मिळणार असून अर्ज प्रक्रिया केवळ ऑनलाइन पद्धतीने mahaanudan.org या संकेतस्थळावर करण्यात येणार आहे. पात्र मंडळांची निवड प्रथम अर्ज प्रथम प्राधान्य या तत्त्वावर केली जाणार आहे. या योजनेसाठी ऑनलाइन अर्ज करण्याची मुदत २३ सप्टेंबर ते २२ ऑक्टोबर अशी आहे. पात्र भजनी मंडळांनी विहित मुदतीत ऑनलाइन अर्ज करावेत, असे आवाहन आहे.

**पात्रतेचे निकष**

एका वर्षात किमान ४० कार्यक्रम सादर करणारे व पूर्ण वेळ व्यवसाय करणारे भजनी मंडळ असावे. भजनी मंडळामध्ये किमान १५ सदस्य असावेत. एकदा अनुदान मिळाल्यानंतर संबंधित संस्था किमान तीन वर्षांनंतर पुन्हा अनुदानासाठी अर्ज करू शकते. एका पथकास या अनुदानाचा लाभ जास्तीत जास्त दोन वेळा अनुज्ञेय असेल.

# थॅलेसेमिया प्रतिबंधासाठी जनजागृतीवर भर द्यावा

## राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांचे निर्देश

**मुंबई : प्रतिनिधी**

थॅलेसेमिया या अनुवंशिक रक्तविकाराच्या प्रतिबंधासाठी जनजागृती, वेळेवर तपासणी आणि समुपदेशनावर अधिक भर देण्यात यावा. थॅलेसेमियाबाबत समाजातील विविध घटकांमध्ये व्यापक जनजागृती निर्माण करून प्रतिबंधात्मक उपाययोजनांना गती द्यावी, असे निर्देश सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी दिले. त्यांच्या अध्यक्षतेखाली 'एक पाऊल थॅलेसेमिया मुक्तीकडे' अभियानाच्या प्रगतीचा आढावा घेण्यासाठी आरोग्य भवन येथे बैठक झाली. त्यावेळी त्या बोलत होत्या.



'एक पाऊल थॅलेसेमिया मुक्तीकडे' अभियानाच्या वर्षपूर्तीनिमित्त १ ते ८ मे २०२६ या कालावधीत 'संकल्प सप्ताह' आयोजित करण्यात आला होता. या माध्यमातून व्यापक लोकसहभाग निर्माण करून थॅलेसेमिया प्रतिबंधासाठी जनजागृती करण्यात आली. पुढील काळातही अभियान अधिक प्रभावीपणे राबवून थॅलेसेमियाच्या प्रतिबंधासाठी आवश्यक उपाययोजनांना गती देण्याच्या सूचना राज्यमंत्री साकोरे-बोर्डीकर यांनी दिल्या. राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर म्हणाल्या की, थॅलेसेमिया हा अनुवंशिक रक्तविकार असून, त्याच्या प्रतिबंधासाठी जनजागृती, वेळेवर तपासणी आणि योग्य समुपदेशन महत्त्वाचे आहे. नागरिक, विद्यार्थी, गर्भवती महिला तसेच आरोग्य कर्मचाऱ्यांमध्ये थॅलेसेमियाबाबत आवश्यक माहिती पोहोचविण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाने सातत्याने प्रयत्न करावेत.

थॅलेसेमिया मायनर असलेल्या व्यक्तींमध्ये आजाराची तीव्र लक्षणे दिसून येतीलच असे नाही, मात्र दोन थॅलेसेमिया मायनर व्यक्तींच्या विवाहामुळे अपत्याला थॅलेसेमियाचा धोका वाढू शकतो. त्यामुळे विवाहपूर्व तपासणी आवश्यक आहे.

# थलसेना कॅम्पमध्ये अथर्व देसाईने केले महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या चांगू काना ठाकूर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या द्वितीय वर्ष जैवतंत्रज्ञान विभागातील विद्यार्थी जेयूओ अथर्व देसाई याने अखिल भारतीय थलसेना कॅम्प (एआयटीएससी) २०२६ मध्ये महाराष्ट्र संचालनालयाच्या संघाचे प्रतिनिधित्व करत उल्लेखनीय कामगिरी केली. राष्ट्रीय छात्रसेना (एनसीसी) मधील कॅडेट म्हणून एआयटीएससी २०२६ साठी निवड होण्यापूर्वी अथर्वला एकूण सात प्रशिक्षण व निवड शिबिरांमधून जावे लागले.

या प्रवासात २ सीएटीसी, १ प्री-आयजीसी, १ आयजीसी आणि ३ सीएटी/प्री-टीएससी शिबिरांचा समावेश होता. सातत्यपूर्ण अभ्यास, शारीरिक व बौद्धिक तयारी, विविध स्पर्धात्मक चाचण्या आणि प्रत्येक टप्प्यावर स्वतःला सिद्ध करण्याच्या प्रयत्नांतून त्याने राष्ट्रीय स्तरावरील या कॅम्पपर्यंत मजल मारली. सुरुवातीच्या बटालियन व ग्रुप स्तरावरील निवड प्रक्रियेत विषयाधारित लेखी व तोंडी परीक्षा, तसेच रेड बुकच्या धर्तीवर बहुपर्यायी प्रश्नांची (एमसीक्यू) लेखी परीक्षा घेण्यात आली. त्यानंतर आयजीसी (इंटर ग्रुप कॉम्पिटिशन) हा महत्त्वाचा टप्पा पार पडला. आयजीसीमधील निवड चाचण्या तीन टप्प्यांत झाल्या.

पहिल्या दोन टप्प्यांत वैयक्तिक कामगिरी व स्थान निश्चित करण्यावर, तर तिसऱ्या टप्प्यात गटाच्या एकत्रित कामगिरीवर भर देण्यात आला. आयजीसीमध्ये अथर्वने महाराष्ट्रातील अव्वल १० कॅडेट्समध्ये स्थान मिळवले. त्यानंतर सलग तीन सीएटी/प्री-टीएससी प्रशिक्षण शिबिरांमध्ये त्याने चांगली कामगिरी कायम ठेवली. सीएटी १ मध्ये महाराष्ट्रात ८ वा, सीएटी २ मध्ये ६ वा आणि सीएटी ३/प्री-टीएससीमध्ये ५ वा क्रमांक मिळवत त्याने आपल्या कामगिरीत सातत्याने सुधारणा केली. दिल्ली येथे झालेल्या एआयटीएससीमध्ये महाराष्ट्र संचालनालयाच्या सीनिअर डिव्हिजन (एसडी) संघाने हेल्थ अँड हायजिन (एचएच) विषयात अखिल भारतीय स्तरावर ५वे स्थान, तर सर्व्हिस सब्जेक्टमध्ये चौथे स्थान मिळवले. ही राष्ट्रीय स्तरावरील कामगिरी महाविद्यालयासाठी अभिमानाचा विषय ठरली आहे.

प्रशिक्षकांचे मार्गदर्शन, सहकाऱ्यांचे सहकार्य, नियमित सराव व अभ्यासातील सातत्यपूर्ण मेहनतीच्या बळावर जेयूओ अथर्व देसाईने आपल्या जिद्दीचे आणि समर्पणाचे दर्शन घडवत अखिल भारतीय थलसेना कॅम्प (एआयटीएससी) २०२६साठी महाराष्ट्र संचालनालयाच्या संघात मानाचे स्थान मिळवले.

# व्यसनांपासून दूर राहा; प्रभाकर जोशी यांचे आवाहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नशा किंवा व्यसन ही आजच्या समाजाला लागलेली भयानक कीड असून व्यसनामुळे केवळ व्यक्तीचे आरोग्यच बिघडत नाही, तर संपूर्ण कुटुंब उद्ध्वस्त होण्याची शक्यता असते. देशाचा तरुण राष्ट्राच्या भविष्याचा आधारस्तंभ आहे, मात्र, व्यसनांच्या आहारी जाऊन युवक आयुष्य वाया घालवत आहेत. व्यसनमुक्त समाजासाठी कायद्याबरोबरच जनजागृती महत्त्वाची आहे, असे प्रतिपादन समाजसेवक व भाजप कार्यकर्ते प्रभाकर जोशी यांनी खारघर येथे केले.



खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना युनिटच्या वतीने नशामुक्त युवा-विकसित भारत संकल्प अभियान अंतर्गत जनजागृती उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्रभाकर जोशी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी प्रभाकर जोशी म्हणाले की, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येत असलेले नशामुक्त भारत अभियान व्यसनमुक्त समाजाच्या निर्मितीसाठी महत्त्वपूर्ण पाऊल आहे, मात्र केवळ कायदा किंवा सरकारी अभियानाच्या माध्यमातून व्यसनाचा प्रश्न पूर्णपणे सुटणार नाही. त्यासाठी कुटुंब, शैक्षणिक संस्था, सामाजिक संस्था व प्रत्येक नागरिकाने पुढाकार घेऊन तरुणांमध्ये व्यसनाच्या दुष्परिणामांविषयी जनजागृती करणे आवश्यक आहे.

युवकांनी व्यसनाला नकार देऊन शिक्षण, क्रीडा, संस्कार आणि राष्ट्रनिर्मितीच्या कार्याला प्राधान्य द्यावे, असे आवाहन त्यांनी केले. तरुणांमध्ये मादक पदार्थांच्या सेवनामुळे होणाऱ्या शारीरिक, मानसिक व सामाजिक दुष्परिणामांविषयी जागरूकता निर्माण करणे तसेच निरोगी आणि जबाबदार जीवनशैलीला प्रोत्साहन देणे अभियानाचा मुख्य उद्देश आहे. मादक पदार्थांना नाही म्हणा, आरोग्य निवडा आणि कणखर मन घडवा, हा संदेश महाविद्यालयाच्या एनएसएस युनिटच्या वतीने विद्यार्थ्यांपर्यंत पोहचवण्यात आला. व्यसनमुक्त तरुणाई हीच विकसित भारताची ताकद असून प्रत्येक युवकाने स्वतः व्यसनापासून दूर राहण्याबरोबरच मित्रपरिवारात व समाजातही व्यसनमुक्तीचा संदेश पोहचवावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले. उपक्रमास प्राध्यापिका महेश्वरी झिरपे, शिक्षकवर्ग, एनएसएस स्वयंसेवक तसेच विद्यार्थी उपस्थित होते.

### नेरूळमध्ये मध्यरात्री अजगराचा थरार

**नवी मुंबई : बातमीदार**

नेरूळ सरसोळे येथील महानुभाव पंथ दफनभूमीजवळ मध्यरात्री सात फुटांचा महाकाय अजगर आढळला. अजगर पाहताच उपस्थित नागरिकांची तारांबळ उडाली.रस्त्यावरून जाणाऱ्या एका नागरिकाला हा भलामोठा अजगर दिसून आला. प्रसंगावधान राखून त्यांनी तातडीने गुगलवरून संपर्क शोधत सर्पमित्र धीरज गायकवाड यांना पाचारण केले, मात्र सर्पमित्र घटनास्थळी पोहोचेपर्यंत हा सुमारे सात फूट लांबीचा अजगर बाजूलाच असलेल्या नाल्यामध्ये निघून गेला.

परिसरात साप आढळल्यास घाबरून न जाता किंवा त्याला इजा न करता तत्काळ जवळच्या सर्पमित्रांशी किंवा वनविभागाशी संपर्क साधण्याचे आवाहन आहे.

# गणेशोत्सव मंडपात गिरवले सीपीआरचे धडे

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

गणेशोत्सवाच्या काळात गणेश मंडपांमध्ये मोठी गर्दी होत असल्याने आपत्कालीन परिस्थितीत तातडीची प्राथमिक मदत मिळणे महत्त्वाचे ठरते. याच पार्श्वभूमीवर जागतिक हृदय दिनानिमित्त मेडिकव्हर हॉस्पिटलतर्फे खारघर सेक्टर १०चा राजा आणि कोपरा येथील गणेश मित्र मंडळाच्या मंडपांमध्ये नागरिकांना कार्डिओपल्मोनरी रिससिटेशन (सीपीआर) प्रशिक्षण देण्यात आले.



हृदयाचे ठोके अचानक बंद पडल्यास छातीवर दाब देऊन रक्ताभिसरण सुरू ठेवण्याची प्रक्रिया म्हणजे सीपीआर. हृदयविकाराच्या आपत्कालीन प्रसंगी वैद्यकीय मदत पोहोचेपर्यंत तातडीने सीपीआर सुरू केल्यास रुग्णाच्या महत्त्वाच्या अवयवांना रक्तपुरवठा सुरू ठेवण्यास मदत होऊ शकते. त्यामुळे अशा परिस्थितीत उपस्थितांनी घाबरून न जाता त्वरित योग्य पद्धतीने मदत करणे आवश्यक असल्याचे प्रशिक्षणादरम्यान सांगण्यात आले.

# अंगण दत्तक योजनेची उपमहापौर दशरथ भगत यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

'सुगंधी शहर अभियान' अंतर्गत 'अंगण दत्तक योजना २०२६'च्या प्रभावी अंमलबजावणीला आता वेगाने सुरुवात झाली आहे. नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील सार्वजनिक जागांचे पालकत्व स्वीकारून त्यांची स्वच्छता करणे, 'कचरा ना टाकणार, ना टाकू देणार', जतन व संवर्धन या मूळ संकल्पनेवर आधारित असलेल्या या योजनेची महत्त्वपूर्ण आढावा बैठक नुकतीच महापालिकेतील दालनात उपमहापौर दशरथ भगत यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.



नवी मुंबई क्षेत्रातील सार्वजनिक वास्तू, मोकळ्या जागा (दत्तक) आणि निर्धारित नागरिक (पालकत्व) हे या योजनेचे तीन मुख्य आधारस्तंभ आहेत. शहराचा प्रत्येक शहर सेवा लाभार्थी नागरिक स्वयंप्रेरणेने आणि कर्तव्यपूजा या जबाबदारीच्या भावनेने या मोहिमेत कसा सहभागी होईल, यावर बैठकीत सविस्तर मंथन करण्यात आले. हे अभियान केवळ कागदावर न राहता त्याचे प्रत्यक्ष जनसहभाग चळवळीत व सकारात्मक परिणाम नागरिकांना शहरात दिसतील, असा ठाम विश्वास उपमहापौर दशरथ भगत यांनी यावेळी व्यक्त केला. तसेच एक हजारहून अधिक शहर सेवा लाभार्थी यांनी कर्तव्यपूजा म्हणून पालकत्वाचे दायित्व स्वीकारले आहे, त्यांच्याप्रति अभिनंदन व्यक्त केले.

हा उपक्रम तळागाळातील केंद्र, राज्य आणि पालिका सेवा लाभार्थी लोकांपर्यंत सुलभतेने पोहोचावा यासाठी sugandhishahar.org हे विशेष संकेतस्थळ विकसित करण्यात आले आहे. या बैठकीला उपक्रमाच्या कोर टीमचे सदस्य नगरसेवक निशांत भगत, ज्येष्ठ पत्रकार सुधीर शर्मा, प्रशांत ननावरे, विजय जाधव, हिमांशू मोदी, वैभव खैरे, मनोज महाराणा, राजेश पाटील, सुनील पाटील, मनीष पाटील, स्वप्निल पाटील आणि जयेश आक्रे आदी मान्यवर उपस्थित होते. स्वच्छ भारत अभियानात नवी मुंबईने नेहमीच देशात तिसरा आणि राज्यात प्रथम क्रमांक राखून आपले वेगळेपण सिद्ध केले आहे. नवी मुंबईचे शिल्पकार गणेश नाईक यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून सुरू झालेल्या या अभियानात, त्यांनी स्वतः सार्वजनिक जागेचे पालकत्व घेण्याची इच्छा जाहीर कार्यक्रमात व्यक्त केली होती. त्यानुसार त्यांच्यासाठी कोणती जागा निर्धारित करावी, यावर बैठकीत विचारविनिमय झाला असून याबाबतची सविस्तर माहिती लवकरच उपमहापौर कार्यालयाकडून जाहीर केली जाईल.

# राज्योत्सवानिमित्त महापालिकेचा कलागणेश महोत्सव उत्साहात

**नवी मुंबई : बातमीदार**

गणेशोत्सव हा सर्व पिढ्यांना एकत्र आणणारा सण असून या निमित्ताने एकमेकांच्या आनंदात सहभागी होता येते. आजही नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने आयोजित कलागणेश महोत्सवात 'हे गजवदन' हा कार्यक्रम सादर करताना विद्यार्थ्यांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सगळ्या पिढ्यांचे प्रेक्षक समोर होते, त्यामुळे कार्यक्रम करताना विशेष आनंद लाभला, अशा शब्दांत सुप्रसिद्ध संगीतकार-गायक डॉ. सलील कुलकर्णी यांनी आपले मनोगत व्यक्त केले.



वाशीचे विष्णुदास भावे नाट्यगृह हे कार्यक्रम करण्यासाठी आम्हा कलावंतांचे अत्यंत आवडते सभागृह असून नवी मुंबईतील रसिक अतिशय उत्तम असल्याचाही त्यांनी विशेष उल्लेख केला.महाराष्ट्र शासनाच्या आदेशानुसार 'गणेशोत्सव' हा 'राज्य महोत्सव' म्हणून साजरा होत असताना महापौर सुजाता पाटील यांच्या संकल्पनेतून, आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली नवी मुंबई महानगरपालिका क्रीडा व सांस्कृतिक विभागाच्या वतीने 'कलागणेश महोत्सव' या विशेष उपक्रमाचे विष्णुदास भावे नाट्यगृह येथे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी डॉ. सलील कुलकर्णी यांनी 'सूर नवा ध्यास नवा' फेम गायिका सन्मिता धापटे-शिंदे यांच्यासह 'हे गजवदन...' ही भक्तिगीतांची सुरेल मैफल सादर करून रसिकांची मने जिंकली. याप्रसंगी क्रीडा, सांस्कृतिक व युवक कल्याण समितीचे सभापती गिरीश म्हात्रे व उपसभापती राजू मढवी, नगरसेवक विशाल विचारे, नगरसेविका संतोषी म्हात्रे व दीक्षा कचरे, क्रीडा विभागाच्या उपायुक्त अभिलाषा म्हात्रे आणि इतर मान्यवर उपस्थित होते.रसिकांच्या उत्स्फूर्त प्रतिसादात संपन्न झालेल्या या कार्यक्रमात भक्तिगीत गायन सुरू असताना चित्रकार सागर जाधव यांनी कॅनव्हासवर श्रीगणेशाची प्रतिमा रेखाटण्यास सुरुवात केली.

त्याचप्रमाणे मूर्तिकार मयुरी ठाकरे व जतिन पाटील यांनी श्रीगणेश मूर्ती बनविण्यास सुरुवात केली. कार्यक्रमाच्या सांगतेप्रसंगी पूर्ण झालेली श्रीगणेशाची चित्राकृती उपसभापती राजू मढवी यांच्याकडे प्रदान करण्यात आली.यावेळी विष्णुदास भावे नाट्यगृहाच्या पॅसेजमध्ये सुलेखनकार आशिष तांबे यांनी अष्टविनायकांच्या नावांतून साकारलेल्या श्रीगणेश चित्रांचे प्रदर्शन लावण्यात आले होते. त्यालाही नागरिकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला. श्रीगणेशोत्सवाची परंपरा, संस्कृती व कला जागतिक स्तरावर संग्रहित करणाऱ्या महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक विभागाच्या प्रकल्पात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले.

# ऐरोली अग्निशमन दलाचा रौप्यमहोत्सवी गणेशोत्सव

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

महानगरपालिकेच्या ऐरोली अग्निशमन केंद्राच्या वतीने यंदा २५व्या वर्षी अर्थात रौप्यमहोत्सवी वर्षात गणेशोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. नवी मुंबईकरांच्या सुरक्षेसाठी तत्परतेने कार्यरत असणाऱ्या अग्निशमन दलाने गणेशोत्सवाची ही परंपरा सुरू करून सामाजिक बांधिलकी जपली आहे. मंडळाने यंदा अष्टविनायकाचा देखावा साकारला आहे.

नितीन कांबळे यांच्या अध्यक्षतेखाली गणेशोत्सव साजरा होतो. सचिन भोसले, केंद्र अधिकारी, लीडिंग फायरमन समीर परब, लीडिंग फायरमन महेंद्र शिरसाट, अग्निशामक अमोल पगार, कर्मचारी विजय सोनवणे आदींच्या सहकार्याने यंदाचा गणेशोत्सव साजरा करण्यात येत आहे.



# भाजप नेते प्रितम म्हात्रे रुग्णांच्या भेटीला

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

तुपगाव येथे एक हात मदतीचा सामाजिक संस्था, लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्ट आणि रोटरी क्लब, पनवेल यांच्या सहकार्याने आयोजित मोफत डोळे तपासणी व आरोग्य शिबिरात पुढील उपचार व शस्त्रक्रियेचा सल्ला देण्यात आलेले रुग्ण उपचारासाठी लक्ष्मी चॅरिटेबल ट्रस्ट, पनवेल येथे दाखल झाले. यावेळी भाजप नेते प्रितम म्हात्रे यांनी स्वतः ट्रस्टमध्ये जाऊन रुग्णांची भेट घेत आस्थेने विचारपूस केली.



प्रत्येकाची आपुलकीने विचारपूस करत त्यांनी उपचाराबाबत माहिती घेतली. शिबिरात सांगितल्याप्रमाणे रुग्णांची आवश्यक तपासणी व आजाराचे निदान करण्यात येत असल्याची खात्रीही त्यांनी केली. तसेच रुग्णांच्या राहण्याची व जेवणाची व्यवस्था उत्तम प्रकारे करण्यात आल्याचे पाहून त्यांनी समाधान व्यक्त केले. शिबिर घेऊन आपली जबाबदारी संपत नाही. तपासणीसाठी आलेल्या गरजू व्यक्तीला आवश्यक उपचार मिळून तो समाधानाने घरी परतेपर्यंत त्याच्यासोबत राहणे हीच खरी सेवा आहे.

आपल्या माणसांना योग्य उपचार मिळून चेहऱ्यावर समाधान दिसावे यापेक्षा मोठा आनंद दुसरा नाही, अशी भावना प्रितम म्हात्रे यांनी व्यक्त केली.

# पनवेलचा विघ्नहर्त्याला चिमुकल्यांची उत्स्फूर्त भेट

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन पनवेल येथील सेक्टर ८ मधील जागृती पीपल्स असोसिएशन व अष्टविनायक मित्र मंडळाच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही १० दिवसांचा गणेशोत्सव मोठ्या उत्साहात आणि विविध सामाजिक उपक्रमांनी साजरा करण्यात येत आहे. पनवेलचा विघ्नहर्ता म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या गणेशोत्सवाला परिसरातील नागरिकांसह विविध शैक्षणिक संस्थांकडूनही उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.



गणेशोत्सवानिमित्त सेंट विल्फ्रिड विद्यालयातील प्ले ग्रुप ते इयत्ता दुसरीपर्यंतच्या विद्यार्थ्यांनी तसेच शिक्षकांनी मंडळाला भेट देऊन श्री गणरायाचे मनोभावे दर्शन घेतले. यावेळी चिमुकल्या विद्यार्थ्यांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळाला. विद्यार्थ्यांनी गणेशमूर्तीचे दर्शन घेत गणरायाची आराधना केली. गणेशोत्सवाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आपल्या संस्कृती, परंपरा व सामाजिक बांधिलकीची ओळख व्हावी, या उद्देशाने या भेटीचे आयोजन करण्यात आले. जागृती पीपल्स असोसिएशन व अष्टविनायक मित्र मंडळाच्या वतीने दरवर्षी गणेशोत्सवाच्या काळात विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि जनजागृतीपर उपक्रमांचे आयोजन केले जाते.

# प्रतिबंधित तंबाखूचा साठा जप्त

## करंजाडेत कारवाई




**पनवेल : वार्ताहर**

करंजाडे सेक्टर-५ परिसरात प्रतिबंधित पानमसाला व सुगंधित तंबाखूचा साठा आढळून आल्याने पनवेल शहर पोलिसांनी दोघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. या कारवाईत एकूण ९२१ पाकिटे असा सहा हजार ८९७ रुपये किमतीचा साठा जप्त करण्यात आला आहे. अन्न सुरक्षा अधिकारी रोहित भारत लोकारे यांच्या तक्रारीवरून पवनकुमार मौर्या (३१) आणि ध्यानसिंग पाल (३२, दोघेही रा. करंजाडे) यांच्याविरुद्ध पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणातील पुरवठादार अमित हा फरार असल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार करंजाडे सेक्टर-५ येथील फॅमिली पान शॉप, मेट्रो केमिस्टसमोर तपासणी करण्यात आली. त्यावेळी पवनकुमार मौर्याच्या ताब्यात विविध प्रकारचा पानमसाला व सुगंधित तंबाखूची ४६८ पाकिटे आढळून आली. तसेच ध्यानसिंग पाल याच्या ताब्यातून विविध ब्रँडच्या पानमसाला व तंबाखूची ४५३ पाकिटे जप्त करण्यात आली. दोन्ही ठिकाणच्या कारवाईत ९२१ पाकिटे जप्त करण्यात आली.

अन्न सुरक्षा व मानदे कायदा २००६, संबंधित नियम, भारतीय न्याय संहितेतील कलम २२३, २७४, २७५, १२३ व ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जप्त केलेल्या पदार्थांची पुढील तपासणी आणि पुरवठादाराचा शोध घेण्याची कार्यवाही सुरू आहे. पोलीस उपनिरीक्षक सुनील सरगर पुढील तपास करीत आहेत.

## दुकानदाराला मारहाण करून लूट

**पनवेल : वार्ताहर**

दुकानात घुसून दुकानदाराला मारहाण करून गल्ल्यातील सहा हजार रुपये घेऊन गेल्याच्या आरोपावरून पनवेल शहर पोलिसांनी इदरीस नियाज शेख याला अटक केली आहे. त्याच्याकडून ३२०० रुपये रोख आणि मोबाइल जप्त करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार पनवेल रेल्वे रोडवरील नर्मदा कॉम्प्लेक्ससमोरील दुकानात शंकर रामविलास गुप्ता हे काम करत होते. त्यावेळी इदरीस शेख व त्याचे साथीदार दुकानात आले. त्यांनी गुप्ता यांना शिवीगाळ केली.




**पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि उरणचे आमदार महेश बालदी यांनी न्हावेखाडी येथील सागरशेठ ठाकूर यांच्या निवासस्थानी विराजमान गणरायाचे मनोभावे दर्शन घेतले. यावेळी जिल्हा परिषद सदस्य निकिता खारकर, पंचायत समितीचे सदस्य वितेश म्हात्रे, जिज्ञासा कोळी, निलेश खारकर, धीरज ओवळेकर आदी मान्यवर उपस्थित होते.**

# सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलमध्ये कर्मवीर जयंती उत्साहात



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या उलवे नोड येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलमध्ये शिक्षणमहर्षी कर्मवीर भाऊराव पाटील यांची १३९वी जयंती उत्साहपूर्ण व प्रेरणादायी वातावरणात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर होते. यावेळी प्रमुख मान्यवर म्हणून सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलचे चेअरमन नगरसेवक परेश ठाकूर, रयत शिक्षण संस्थेचे रायगड विभागीय अधिकारी मोहन कोंगेरे, जनरल बॉडी सदस्य वाय. टी. देशमुख, महेंद्र घरत, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य रवींद्र भोयर, रायगड विभागाचे पीआरओ बाळासाहेब कारंडे, गव्हाण जिल्हा परिषद सदस्या निकिता खारकर, स्थानिक स्कूल कमिटी सदस्य निलेश खारकर, कविता खारकर व धीरज ओवळेकर, कामोठेचे मुख्याध्यापक अविनाश कुलकर्णी, एल.आर.टी.ई.एम.एस. व ज्युनिअर कॉलेज कामोठेच्या मुख्याध्यापिका स्वप्नाली म्हात्रे तर प्रमुख वक्ते म्हणून सागर रंधवे उपस्थित होते.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जीवनकार्याला उजाळा देणारी भाषणे सादर केली. आपल्या भाषणातून विद्यार्थ्यांनी कर्मवीरांनी शिक्षणाच्या प्रसारासाठी केलेले कार्य, त्यांचे शैक्षणिक विचार, समाजसेवा तसेच सर्वसामान्य विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण पोहचविण्यासाठी दिलेले योगदान याविषयी माहिती दिली. यावेळी मराठी माध्यमातील इयत्ता दहावीमध्ये उत्तीर्ण झालेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या. तसेच कर्मवीर जयंतीनिमित्त शाळेत आयोजित करण्यात आलेल्या वक्तृत्व स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांचा पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात पार पडला.

विविध गटांतील विजेत्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके व प्रमाणपत्रे प्रदान करण्यात आली. प्रमुख वक्ते सागर रंधवे तसेच उपस्थित मान्यवरांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणातून विद्यार्थ्यांना कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचारांचा आदर्श घेऊन शिक्षण, संस्कार, सामाजिक बांधिलकी आणि प्रामाणिक परिश्रम यांचा अंगीकार करण्याचे आवाहन केले. कर्मवीरांच्या शैक्षणिक कार्यातून प्रेरणा घेऊन विद्यार्थ्यांनी समाजाच्या प्रगतीत योगदान द्यावे, असे आवाहनही यावेळी करण्यात आले. मान्यवर, शिक्षक, पालक व विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे १३९वी कर्मवीर जयंती उत्साहपूर्ण व प्रेरणादायी वातावरणात संपन्न झाली.



पनवेलचा राजा चिंतामणी : हरि ओम सामाजिक मित्र मंडळ, नवीन पनवेल

# गव्हाण विद्यालयात कर्मवीर अण्णांचा पालखी सोहळा उत्साहात




**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३९व्या जयंतीनिमित्त छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेज, गव्हाण-कोपर येथे मंगळवारी जयंती सोहळा व पालखी मिरवणूक उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. लेझीम-झांज पथकाच्या गजरात निघालेल्या मिरवणुकीत विद्यार्थ्यांसह ग्रामस्थांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

प्रारंभी स्थानिक स्कूल कमिटी ज्येष्ठ सदस्य अनंता ठाकूर, विश्वनाथ कोळी, ज्युनिअर कॉलेज कमिटीचे सदस्य विजय घरत, भाऊ भोईर, प्राचार्य ज्योत्स्ना ठाकूर, उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, रयतचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य रवींद्र भोईर, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, लाइफ वर्कर देवेंद्र म्हात्रे, विभागप्रमुख संजय उगले तसेच सर्व रयत सेवक यांच्या हस्ते कर्मवीर अण्णांच्या प्रतिमेचे व पालखीचे पूजन करण्यात आले. गोरगरीब आणि वंचित घटकांतील मुलांना शिक्षणाची संधी मिळावी, या ध्येयाने भाऊराव पाटील यांनी १९१९मध्ये रयतची मुहूर्तमेढ रोवली.

अण्णांनी लावलेल्या ज्ञानवृक्षाचा विस्तार संपूर्ण महाराष्ट्रभर झाला असून त्यांच्या स्वावलंबी शिक्षणाच्या विचारातून असंख्य विद्यार्थी शिक्षणाच्या प्रवाहात आले. या शिक्षणमहर्षींच्या कार्याचे स्मरण करण्यासाठी जयंती सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. सोहळ्याचे आकर्षण ठरले कर्मवीर अण्णांची सजवलेली प्रतिमा व सुंदर पालखी सजावट. शिक्षकेतर कर्मचारी जनार्दन खैरे यांनी प्रतिमेची व पालखीची सजावट केली. याबद्दल स्कूल कमिटी व सर्व रयत सेवकांच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करण्यात आले. लेझीम व झांज पथकाच्या तालावर कर्मवीर अण्णांची पालखी मिरवणूक गव्हाण-कोपर परिसरातून काढण्यात आली.

पालखी कोपर परिसरातून जाताना ग्रामस्थांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. माता-भगिनी व ग्रामस्थांनी पालखीचे पूजन करून कर्मवीर अण्णांना वंदन केले. ग्रंथपाल महेश म्हात्रे तसेच संगीत विद्यार्थी टीमने आरती सादर केली. अण्णांच्या कार्याची प्रेरणा घेऊन शिक्षणाच्या माध्यमातून समाज घडविण्याचा संकल्प विद्यार्थ्यांनी केला. सूत्रसंचालन सांस्कृतिक विभागप्रमुख हर्षला पाटील यांनी केले. सोहळा यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व रयत सेवकांनी परिश्रम घेतले.




कृष्णा पाटील, पडघा, ता. पनवेल







## गणेश दर्शन

**पनवेल : रोज बाजार भाजी मार्केट स्वयंसहाय्यता महिला मंडळातर्फे आयोजित सार्वजनिक गणेशोत्सवाच्या गणरायाचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, युवा नेते प्रितम म्हात्रे यांनी दर्शन घेतले. यावेळी महिला व बालकल्याण सभापती ममता म्हात्रे, नगरसेवक अजय बहिरा, सुमित झुंजारराव, नगरसेविका दर्शना भोईर, प्रतिभा भोईर तसेच साहेबराव घुमरे, आत्माराम लव्हाट, सपना पाटील, कविता पाटील, वैभव पगडे, इनरव्हील क्लब अध्यक्ष शुभांगी बहिरा, सुनीता चौधरी, अरूणा पाटील, अर्चना बाथम, भारती एकलरे, जयश्री कामरकर, सतीश घुमरे, अभिजित तळेकर आदी उपस्थित होते. यावेळी मंडळातर्फे प्रमुख मान्यवरांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.**



मनोहर रामभाऊ कोंडीलकर, जांभिवली, पनवेल




महेंद्र नारायण भोईर, आपटा कोळीवाडा, पनवेल



दिनेश सावंत, आपटा, पनवेल

# रामशेठ ठाकूर विद्यालय जिल्हास्तरीय कबड्डीत प्रथम



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या रामशेठ ठाकूर उच्च माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेत दमदार कामगिरी करत प्रथम क्रमांक मिळवला आहे. जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, मुंबई आणि मुंबई उपनगर असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने २२ सप्टेंबर रोजी दत्तू शेट पाटील विद्यालय, कामोठे येथे जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

सर्व खेळाडूंना क्रीडा शिक्षक प्रवीण पाटील आणि महेंद्र पाटील यांचे मार्गदर्शन लाभले. हार्दिक सचिन साळुंखे, आर्य किरण कदम, शुभम दिनेश पवार, पियुष भीमराव पवार, श्रवण निलेश पाटील, विराज गणेश चाळके, आकाश तुषार पोळ, केशव लोकबहाद्दूर चलने, वीर हेमल वखारिया, सिद्धार्थ जयदास दारावकर, प्रदीप देवीलाल चव्हाण, श्रावण मनोहर चोरगे या सर्व विजेत्या विद्यार्थ्यांचे प्राचार्या निशा नायर यांनी अभिनंदन केले.

## संपादकीय

# ताणाविषयी चर्चा आवश्यक

आयआयटी मुंबईच्या साहिल वाकोडे या विद्यार्थ्याच्या आत्महत्या प्रकरणात चौकशी पूर्ण होण्यापूर्वी कोणालाही दोषी ठरवणे योग्य नाही. या घटनेमुळे पुन्हा एकदा देशातील सर्वोच्च शिक्षणसंस्थांमधील विद्यार्थ्यांच्या मानसिक ताणाचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. प्रकरणाच्या चौकशीसोबतच या मानसिक दबावाविषयी गंभीर चर्चा होणे आवश्यक आहे.

**साहिल वाकोडे हा मुंबई आयआयटीत एनर्जी सायन्स अँड इंजिनिअरिंगचा द्वितीय वर्षाचा विद्यार्थी होता. १८ सप्टेंबर रोजी परीक्षेदरम्यान कक्षातून बाहेर पाठवण्यात आल्यानंतर काही तासांतच त्याने वसतिगृहातील खोलीत आत्महत्या केली. घटनेमागील नेमक्या परिस्थितीचा तपास सुरू असून आयआयटी मुंबईने दहा सदस्यीय चौकशी समिती स्थापन केली आहे. समितीत विद्यार्थी, प्राध्यापक, माजी प्रशासकीय अधिकारी आणि मानसोपचारतज्ज्ञ यांचा समावेश असून सात दिवसांत अहवाल अपेक्षित आहे. या घटनेतील आरोप-प्रत्यारोपांविषयी अंतिम निर्णय तपासातूनच झाला पाहिजे. साहिलच्या कुटुंबाने जातीय भेदभावाचे आरोप केले आहेत तर संस्थेने हे आरोप नाकारले आहेत. चौकशी पूर्ण होण्यापूर्वी कोणालाही दोषी ठरवणे योग्य नाही. या घटनेच्या चौकशीसोबतच विद्यार्थ्यांवरील वाढत्या मानसिक दबावाविषयीही गंभीर स्वरुपाची चर्चा होणे आवश्यक आहे. आयआयटीमध्ये प्रवेश मिळवण्यासाठीची स्पर्धा प्रचंड असते. त्यानंतरही प्रत्येक परीक्षा, प्रत्येक ग्रेड, इंटर्नशिप आणि प्लेसमेंट यातून जाताना अपेक्षांचे दडपण कायमच असते. गेल्या वीस वर्षांत देशातील निरनिराळ्या आयआयटींमध्ये १६० हून अधिक विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्याचे सांगितले जाते. त्यापैकी १४ आत्महत्या या मुंबई आयआयटीतील असल्याची नोंद आढळते. विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांची समस्या गेल्या काही वर्षांत अतिशय गंभीर स्वरुप धारण करू लागली आहे. वाढती स्पर्धा, कारकीर्दीसंदर्भातील अपेक्षा-आकांक्षांचा दबाव ही या आत्महत्यांमागील प्रमुख कारणे दिसतात. विशेषतः वंचित किंवा आर्थिकदृष्ट्या कमकुवत पार्श्वभूमीतून आलेल्या विद्यार्थ्यांसाठी हा संघर्ष अधिक गुंतागुंतीचा असू शकतो. अनेकांसाठी आयआयटीतील प्रवेश हा स्वप्नपूर्ततेच्या निव्वळ जवळ नेणारा असतो. कुटुंबाच्या अनेक वर्षांच्या त्यागाची, आशेची आणि आर्थिक उन्नतीच्या आकांक्षांची पार्श्वभूमी त्याला असते. त्यामुळे अपयशाच्या भीतीचा पराकोटीचा ताण हे विद्यार्थी सदोदित बाळगून असतात. या ताणाला तोंड देण्यासाठी समुपदेशनाचा आधार आयआयटीसारख्या संस्थांमध्ये उपलब्ध असतो खरा, परंतु तो पुरेसा नसल्याचे अनेक विद्यार्थ्यांचे म्हणणे दिसते. मानसिक आरोग्याच्या बाबतीत केवळ 'काउन्सेलिंग सेंटर आहे' एवढे पुरेसे असत नाही. आयआयटी मुंबईच्या विद्यार्थ्यांनी आता समुपदेशनाचा आधार वाढवण्याच्या दृष्टीने काही ठोस मागण्या केल्या आहेत. विद्यार्थ्यांच्या मानसिक आरोग्याबाबत प्राध्यापकांचे प्रशिक्षण या मागणीचाही त्यात समावेश आहे. या मागण्यांवर निश्चितच विचार व्हायला हवा. मात्र या घटनेचे जातीय संघर्षात रूपांतर होऊ देणे टाळले पाहिजे. साहिलच्या मृत्यूची निष्पक्ष चौकशी होऊन दोषी आढळणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई आवश्यकच आहे. पण एखाद्या विद्यार्थ्याच्या दुर्दैवी मृत्यूचा आधार घेऊन शिक्षणसंस्थांना राजकीय संघर्षाचे केंद्र बनवणे नक्कीच टाळायला हवे. शिक्षणसंस्था राजकीय आणि जातीय संघर्षाची केंद्रे बनण्याऐवजी ज्ञान, संधी आणि व्यक्तिमत्त्वविकासाची केंद्रेच राहिल्या पाहिजेत. शिक्षणसंस्थांमध्ये शिस्त आवश्यक आहे. परंतु शिस्तीसोबतच संवेदनशीलताही तितकीच आवश्यक आहे. विद्यार्थ्याला चूक करण्याची, अपयशी होण्याची आणि पुन्हा उभे राहण्याची संधी मिळाली पाहिजे. एका परीक्षेचा निकाल म्हणजे आयुष्याचा निकाल नाही ही जाणीव विद्यार्थ्यांमध्ये निर्माण करणे आणि त्यासाठी कुटुंब, शिक्षक व संस्थांनी सुरक्षित आधारव्यवस्था उभी करणे हीच साहिलसारख्या तरुणांच्या मृत्यूला दिलेली खरी श्रद्धांजली ठरेल.**

# सेवा संकल्प अभियान : जनमनाचे समाधान

राज्य शासनाचा प्रत्येक विभाग १७ सप्टेंबरपासून सेवा संकल्प अभियान या लोकाभिमुख अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अग्रेसर झाला आहे. केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहचविणे, नागरिकांचा सहभाग वाढविणे, त्यांच्या सहभागाचे कौतुक करणे आणि शासन नागरिकांच्या पाठीशी असल्याची भावना दृढ करणे हा या अभियानाचा प्रमुख उद्देश आहे.

देशाचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संवैधानिक पदावरील कारकीर्दीला २५ वर्षे पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने, त्यांच्या कार्यकाळात 'सेवा परमो धर्मः' या भावनेतून सामान्य नागरिकांपर्यंत सेवा पोहोचविण्याच्या प्रयत्नांना अधिक व्यापक स्वरूप देण्यासाठी केंद्र आणि राज्य शासनाकडून विविध सेवा उपक्रम राबविले जात आहेत. याच निमित्ताने महाराष्ट्र शासनाने १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर या महिनाभराच्या कालावधीत राज्यात सेवा संकल्प अभियान राबविण्याचा निर्णय घेतला आहे. हे अभियान म्हणजे कार्यक्रमांची फक्त रेलचेल नसून शासकीय सेवा आणि योजना सामान्य माणसाच्या अधिक जवळ आणि दारापाशी नेण्याचा हा जोरकस प्रयत्न आहे.

'सेवा परमो धर्मः' ही केवळ एक उक्ती नाही, तर सामान्य माणसाच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणण्याची भावना आहे. शासनाच्या योजना तयार होतात, निर्णय घेतले जातात; मात्र त्यांचा खरा अर्थ तेव्हा अधोरेखित होतो, जेव्हा त्या योजनांचा लाभ गावातील सामान्य कुटुंबापर्यंत, शेतकऱ्यांपर्यंत, महिलांपर्यंत, विद्यार्थ्यांपर्यंत आणि गरजू व्यक्तींपर्यंत पोहोचतो. राज्यातले प्रशासन १७ सप्टेंबरपासून सेवा संकल्प अभियान या लोकाभिमुख अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अग्रेसर झाले आहे.

**लोकाभिमुख प्रशासनाची कास**

गावातील सामान्य नागरिकाला प्रमाणपत्र हवे असेल, शेतकऱ्याला जमिनीची नोंद अद्ययावत करायची असेल किंवा एखाद्या गरीब कुटुंबाला शासकीय योजनेचा लाभ घ्यायचा असेल, अशा वेळी अनेकदा विविध कार्यालयांमध्ये फेऱ्या माराव्या लागू शकतात. सेवा संकल्प अभियानात ही प्रक्रिया शक्य तितकी सोपी करण्यावर भर देण्यात आला आहे. महसुली विभागामार्फत प्रत्येक तालुक्यात सेवा सेतू शिबिरे आयोजित करून विविध शासकीय योजनांचे लाभ पात्र नागरिकांना उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. म्हणजेच अनेक सेवा एकाच ठिकाणी मिळण्याची सुविधा निर्माण होणार आहे.

**शिबिरांमुळे कामे गतिमान**

सेवा सेतू शिबिरांमध्ये फेरफार नोंदींचा निपटारा, स्वामित्व सनद, शेतपाणंद रस्ते, शिधापत्रिका, नॉन-क्रिमिलेयर प्रमाणपत्र, वनहक्क दावे, नळजोडणी, वीज जोडणी, दिव्यांग प्रमाणपत्र, विवाह नोंदणी, आधार, जन्म-मृत्यू प्रमाणपत्र, शिकाऊ वाहनचालक परवाना, महिला बचत गट नोंदणी, ज्येष्ठ नागरिक प्रमाणपत्र तसेच ७/१२ आणि ८-अ नोंदी अद्ययावत करण्यासारख्या सेवा जनतेला उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

ज्या सेवेसाठी नागरिकाला वारंवार कार्यालयात जावे लागते, ती सेवा शक्य तितकी त्याच्या जवळ नेण्याचा प्रयत्न या सेवा संकल्प अभियानातून होणार आहे.

**गावातच सेवा आणि समाधान**

सेवा संकल्प अभियानाचा विशेष भर ग्रामीण भागावरही आहे. प्रत्येक गावात आणि वॉर्डात स्थानिक गरजेनुसार सेवा माझे योगदान उपक्रम राबविण्यात येणार आहेत. गावातील युवक, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि सामाजिक क्षेत्रातील व्यक्तींना यामध्ये सहभागी करून घेतले जाणार आहे. गाव स्वच्छ ठेवणे, नदीघाट आणि बारवांची स्वच्छता करणे, वृक्षारोपण करणे, रक्तदान करणे, आरोग्य तपासणी शिबिर घेणे, प्लास्टिकमुक्तीची जनजागृती करणे, जलसंधारण करणे, कचऱ्याचे वर्गीकरण करणे, रस्ते सुरक्षेबाबत जागृती करणे अशा अनेक उपक्रमांना या माध्यमातून चालना मिळणार आहे.

**शासन, सेवा आणि समाजविकास**

शासनाची सेवा आणि समाजाचा सहभाग एकत्र आला, तर गावाचा विकास अधिक वेगाने होऊ शकतो. ही वस्तुस्थिती आहे. ग्रामीण भागातील नागरिकांसाठी जमीन आणि महसूल विषयक कागदपत्रे अत्यंत महत्त्वाची असतात. फेरफार नोंदी, ७/१२, ८-अ, स्वामित्व सनद, वनहक्क दावे यांसारख्या बाबी अनेकांच्या दैनंदिन जीवनाशी जोडलेल्या आहेत. त्याचे महत्त्व प्रत्येकाच्या आयुष्यात खूप जास्त आहे.

वनहक्क दाव्यांच्या बाबतीत नवीन दावे स्वीकारणे, जुन्या दाव्यांमधील दुरुस्ती करणे आणि पात्र दावे निकाली काढण्याची प्रक्रिया अभियानाच्या कालावधीत पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. म्हणूनच सेवा संकल्प अभियानाचा लाभ गावातील नागरिकांनी आपल्या दैनंदिन गरजांशी जोडून पाहणे महत्त्वाचे आहे. ग्रामीण जनतेची दैनंदिन गरजांची पूर्तता या अभियानात प्रामुख्याने केली जात आहे.

**अंगणवाडीत मुख्य उत्सव**

लहान मुले आणि त्यांच्या मातांसाठीही या अभियानांतर्गत विशेष उपक्रम राबविण्यात येणार आहे. अंगणवाडी उत्सव अंतर्गत अंगणवाडी केंद्रांवर मुलांसोबत मातांना आमंत्रित करून महिलांना आरोग्य आणि पोषणविषयक योजनांची माहिती देण्यात येणार आहे. मुलांसाठी मनोरंजनाचे कार्यक्रम, फळे व मिठाईचे वाटप आणि अंगणवाडी सेविका, मदतनीस व आशा कार्यकर्त्यांचा सन्मान करण्याच्या उपक्रमाचा समावेश या अभियानात करण्यात आला आहे.

ग्रामीण कुटुंबाच्या आरोग्याचा पाया मजबूत करण्यासाठी आई आणि बालकाचे आरोग्य महत्त्वाचे आहे. त्यामुळे अंगणवाडी उत्सव हा केवळ एक कार्यक्रम न राहता माता, बालक आणि पोषण यांना जोडणारा उपक्रम ठरतो.

**नव्या कल्पनांना व्यासपीठ**

आज ग्रामीण भागातील तरुणांकडे अनेक चांगल्या कल्पना आहेत. शेती, पाणी, शिक्षण, आरोग्य, रोजगार, तंत्रज्ञान अशा अनेक क्षेत्रांत ते नवे प्रयोग करू शकतात. योग्य संधी आणि व्यासपीठ मिळाले, तर या कल्पना मोठ्या बदलाचे कारण ठरू शकतात. सेवा संकल्प अभियानात राज्यातील युवा, विद्यार्थी, स्टार्टअप्स, व्यावसायिक, कॉर्पोरेट इनोव्हेटर्स आणि ग्रामीण भागात नवे प्रभावी उपाय विकसित करणाऱ्या व्यक्तींना जोडण्यासाठी इनोव्हेशन चॅलेंज आयोजित करण्यात येणार आहे. शैक्षणिक संस्था, स्टार्टअप नेटवर्क, इन्क्युबेशन सेंटर आणि खासगी कंपन्यांचाही सहभाग घेतला जाणार आहे. निवडलेल्या उत्कृष्ट कल्पनांना तज्ज्ञांसमोर सादरीकरणाची संधी मिळणार आहे.

**विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना दिशा**

देशाचे भविष्य वर्गखोल्यांमध्ये घडत असते. त्यामुळे विद्यार्थ्यांनाही या अभियानाशी जोडण्यात आले आहे. विकसित भारत आणि मुलांच्या स्वप्नातील भारत या विषयांवर शिक्षण विभागामार्फत चित्रकला आणि वक्तृत्व स्पर्धा घेण्यात येणार आहेत. विद्यार्थ्यांच्या कल्पना आणि स्वप्नांना व्यासपीठ देण्याचा हा प्रयत्न आहे.आजचा विद्यार्थी उद्याचा नागरिक आहे. त्यामुळे विकसित भारताची संकल्पना विद्यार्थ्यांच्या मनात रूजविण्यासोबतच त्यांच्या कल्पना आणि स्वप्नांना भविष्यातील भारताच्या उभारणीशी जोडण्याचा हा प्रयत्न आहे.

**लाभार्थ्यांच्या घरी आशीर्वादाचा दिवा**

शासकीय योजनेचा लाभ मिळालेल्या नागरिकाच्या घरापर्यंत जाऊन आशीर्वादाचा दिवा प्रज्वलित करण्याचा उपक्रमही या अभियानात समाविष्ट करण्यात आला आहे. विविध योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळालेल्या निवडक लाभार्थ्यांच्या घरी जाऊन दीप प्रज्वलित करणे, हा या उपक्रमामागील उद्देश आहे. शासकीय योजनांचा लाभ एखाद्या कुटुंबाच्या घरात पोहचतो, तेव्हा त्या योजनेला खरा अर्थ प्राप्त होतो. त्या समाधानाच्या क्षणाला प्रकाशमान करणारा हा उपक्रम या अभियानात आयोजिला जात आहे.

**सकारात्मक बदलाची गोष्ट**

एखाद्या शेतकऱ्याला योजनेचा लाभ मिळाल्याने शेतीत बदल झाला, एखाद्या महिलेला बचत गटामुळे आर्थिक आधार मिळाला, एखाद्या विद्यार्थ्याला संधी मिळाली किंवा एखाद्या कुटुंबाचे जीवनमान सुधारले, तर ही केवळ एका व्यक्तीची गोष्ट राहत नाही. ती इतरांसाठीही प्रेरणा बनते.

म्हणूनच बदलाची गोष्ट या उपक्रमातून विविध योजनांमुळे नागरिकांच्या जीवनात झालेला सकारात्मक बदल त्यांच्या स्वतःच्या शब्दांत समाजासमोर आणला जाणार आहे. त्यांच्या अनुभवांचे व्हिडीओ आणि रील्सच्या माध्यमातून संकलन करण्यात येणार आहे.

**सेवा संकल्पाचे खरे उद्दिष्ट**

सेवा संकल्प अभियानातील प्रत्येक उपक्रमामागे वेगवेगळी उद्दिष्टे असली, तरी त्यामागची भावना एकच आहे-सामान्य नागरिकाला सेवा मिळविण्यासाठी अधिक सोपे, सुलभ आणि जवळचे वातावरण निर्माण करणे. १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर या काळात प्रशासन आणि सामान्य नागरिक यांच्यातील संवाद व लोकसहभाग वाढविणारा ठरणार आहे. योजनांचा लाभ अधिकाधिक पात्र लाभार्थ्यांना मिळावा, शासन अधिक लोकाभिमुख व्हावे आणि शासनाच्या योजना सामान्य नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहचाव्यात हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश आहे. माहितीअभावी पात्र व्यक्ती वंचित राहता कामा नये ही या उपक्रमामागील प्रमुख भूमिका आहे. या अभियानाला नागरिकांचा मिळणारा प्रतिसाद त्याच्या यशासाठी महत्त्वाचा ठरणार आहे. शासनाचे सर्व विभाग अत्यंत उत्साहाने आणि पुढाकाराने उपक्रमशील झाले आहेत. गाव, तालुका, जिल्हा या सर्वच पातळ्यांवर सेवा संकल्प अभियान लोकहिताचे आणि जनसामान्यांचे जीवनमान अधिक सुकर करण्यासाठीचे शासनाचे लोकाभिमुख अभियान ठरणार आहे यात शंका नाही.

**-विभागीय माहिती कार्यालय, अमरावती**



## बदलते तंत्रज्ञान

# चेहरा भाड्याने द्या आणि घरीच बसून लाखो रुपये कमवा!

आजच्या डिजिटल युगात आर्टिफिशियल इंटेलिजन्सने अक्षरशः धुमाकूळ घातला आहे. रील बनवणे, व्हिडिओ एडिट करणे किंवा एआय चॅटबॉट्सचा वापर तर जगभर सुरू आहे, पण चीनमधून एक अशी थक्क करणारी बातमी समोर आली आहे, जिथे लोक फक्त आपला 'चेहरा' भाड्याने देऊन लाखांची कमाई करत आहेत. होय, अगदी खरं आहे! जर तुम्हालाही पैशांची गरज असेल आणि तुमचा चेहरा एआयच्या या जगात विकायची तयारी असेल, तर तुम्हीही छप्परफाड कमाई करू शकता.



चीनमध्ये 'एआय फेस लायब्ररींग' ही भन्नाट कॉन्सेप्ट वेगाने लोकप्रिय होत आहे. यामध्ये लोकांना शूटिंगसाठी किंवा स्टुडिओमध्ये जाण्याची गरजच उरत नाही. फक्त स्वतःच्या चेहऱ्याचा डिजिटल परवाना द्यायचा आणि लाखो रुपये कमवायचे.

चीनमधील काही हाय-टेक प्लॅटफॉर्म्सनी लोकांना स्वतःचे 'डिजिटल ॲक्टर प्रोफाईल' तयार करण्याची मुभा दिली आहे. या प्रक्रियेत तुमची ओळख पटवून तुमचा चेहरा स्कॅन केला जातो. एकदा का चेहऱ्याचा डिजिटल परवाना तयार झाला, की कंपन्या जाहिराती, शॉर्ट ड्रामा, फिल्म्स किंवा मोबाईल गेम्समध्ये तुमच्या चेहऱ्याचा बिनधास्त वापर करतात.

विशेष म्हणजे, हे एआय जनरेटेड चेहरे इतके हुबेहूब आणि अस्सल वाटतात की, समोरच्या व्यक्तीला ती खरोखरच एखादी जिवंत व्यक्ती असल्याचे भासते. या तंत्रज्ञानामुळे आता सेलिब्रिटी असो वा एखादा सर्वसामान्य माणूस, प्रत्येकाच्या चेहऱ्याला बाजारात मोठी मागणी वाढली आहे.

या व्यवसायाची व्याप्ती पाहता, कमाईचे आकडे पाहून तुमचे डोळे विस्फारतील. काही छोट्या प्लॅटफॉर्म्सवर चेहऱ्याच्या वापरासाठी ५० युआनपासून (सुमारे ६७० रुपये) सुरुवात होते. एका मीडिया रिपोर्टनुसार, एका व्यक्तीने फक्त तीन दिवसांत आपला चेहरा ७ वेळा वापरू दिला, ज्याच्या बदल्यात त्याला २,५०० युआन (अंदाजे ३५,४२४ रुपये) मिळाले. तर, काही हाय-एन्ड करारांमध्ये ही किंमत थेट ९९,९९९ युआन (सुमारे १४ लाख ३६ हजार रुपये) पर्यंत पोहोचत आहे.

या संपूर्ण प्रक्रियेत महत्त्वाची गोष्ट म्हणजे, तुमचा चेहरा कुठे आणि कसा वापरला जाणार हे ठरवण्याचा अधिकार पूर्णपणे तुमच्याकडेच असतो. तुम्ही तुमची डिजिटल ओळख कोणत्या प्रकारच्या कंटेंटसाठी वापरायची आणि किती मुदतीसाठी परवाना द्यायचा, हे आधीच ठरवू शकता.

# लेखक, शब्दकोशकार, अनुवादक श्रीपाद जोशी



## निमित्त

श्रीपाद जोशी यांचे रूढ शिक्षण मॅट्रिकपर्यंतच झाले, आज त्यांचा स्मृतिदिन (२४ सप्टेंबर २००२) आहे. श्रीपाद जोशी हे ग्रहणशील मन आणि सुशिक्षित, सुसंस्कृत माणसांचा सहवास यांमुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व विचारी आणि विवेकी बनले. आचार्य काका कालेलकरांकडे आठ वर्षे राहून ते हिंदी, गुजराती, बंगाली या भाषा शिकले. दिल्लीत एक वर्ष राहून त्यांनी उर्दू साहित्याचा अभ्यास रसिकतेने केला.

१९४२ सालच्या 'छोडो भारत' चळवळीत सरकारविरोधी पत्रके वाटल्याबद्दल त्यांना कारावासाची शिक्षा झाली. कारावासातच त्यांनी कथा, कादंबरी, अनुवाद अशा स्वरूपाचे लेखन केले. पुढे गांधीजींच्या 'हिंदुस्थानी प्रचार सभा' संस्थेत दोन वर्षे चिटणीस आणि नंतर गारगोटी येथील मौनी विद्यापीठात चार वर्षे, तसेच पुण्याच्या गोखले अर्थशास्त्र संस्थेत पंधरा वर्षे त्यांनी काम केले.

जोशी यांनी लहान-मोठी सुमारे दीडशे पुस्तके लिहिली. त्यापैकी काही महत्त्वाच्या पुस्तकांचा परिचय इथे दिला आहे. रामानंद सागर लिखित 'और इन्सान मर गया' या हिंदी कादंबरीचे मराठी भाषांतर 'आणि माणसाचा मुडदा पडला' हे आहे. भारताच्या फाळणीच्या वेळी हिंदू-मुसलमानांमधील द्वेष किती पराकोटीला गेला होता, आणि त्यामुळे केवढा भीषण रक्तपात झाला, याचे थरारक दर्शन ही कादंबरी घडविते.

'विस्कटलेलं घरटं' ही जोशींची स्वतंत्र कादंबरी होय. महाराष्ट्रातील ब्राह्मण-ब्राह्मणेतर वाद, स्पृश्यास्पृश्य वाद, खेडे-शहर, कूळ-जमीनमालक अशा वर्तमानकालीन द्वंद्वांवर ही कादंबरी प्रकाश टाकते. जेव्हा या द्वंद्वांशी संबंधित लोक, राजकीय पुढारी या वादांवर निर्मळ मनाने विचार करतील, तेव्हाच या वादांना मूठमाती मिळेल; असे लेखकाचे म्हणणे आहे.


'भारतीय मुसलमान: काल, आज, उद्या' हे लेखकाचे एक महत्त्वाचे पुस्तक. मुसलमानांच्या परिस्थितीची वस्तुनिष्ठ चर्चा करून लेखक असा निष्कर्ष काढतात की, जुना इतिहास विसरून मुसलमान या भारतभूमीशी एकरूप झाले, तर इतर जातींप्रमाणे त्यांचेही भवितव्य उज्ज्वल होईल. मात्र ज्यांना भारतीय राज्यघटनेची चौकट मान्य नाही, त्यांना या देशात स्थान नाही. असे आपले परखड मत लेखकाने नोंदविलेले आहे.

'खलील जिब्रान' हा लेबॅनॉनमधील स्वतंत्र विचारांचा लेखक, कवी आणि चित्रकार होय. तो ख्रिश्चन होता. पण त्याची जीवनमूल्ये फारच उच्च आणि प्रचलित ख्रिस्ती विचारांना धक्का देणारी होती. मराठी वाचकांना खलील जिब्रान कळावा म्हणून त्यांची सात पुस्तके लेखकाने मराठीत अनुवादित केलेली आहेत.

'जा जरा पूर्वेकडे' ह्या पुस्तकात जपानमधील प्रवासाचे वर्णन आहे. एकंदरीत जोशींच्या पुस्तकांमधून त्यांचे गांधीवादी, समाजवादी विचार आणि त्यांचे समतोल, उदार मनही कळते.'उर्दू-मराठी शब्दकोश' लिहून जोशी यांनी मराठी, उर्दू अभ्यासकांची फार मोठी सोय करून ठेवली आहे.त्यांना साहित्य अकादमीच्या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

**-शशिकांत मांडके**

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# ओठांसाठी काय आहे अधिक फायदेशीर?

आपले ओठ अत्यंत नाजूक असतात आणि त्यामुळंच हवामान, गरम-थंड बदल, एसीमधील सतत वास्तव्य किंवा शरीरातील पाण्याच्या कमतरतेचा परिणाम सर्वप्रथम होठांवरच दिसून येतो. फाटलेले, कोरडे आणि खवखवीत ओठ ही आता फक्त हिवाळ्यातलीच समस्या उरलेली नाही, तर वर्षभर भेडसावणारी बाब झाली आहे. अशा स्थितीत होठांच्या देखभालीसाठी आपण बहुतेक वेळा दोन गोष्टींमध्ये अडकतो.



**लिप बाम की लिप ऑईल?**

आज आपण जाणून घेणार आहोत की या दोघांमध्ये नेमकं काय वेगळं आहे, त्यांचे फायदे काय आहेत आणि तुमच्या ओठांसाठी कोणता पर्याय अधिक योग्य ठरेल.

**लिप बाम-पारंपरिक आणि सुरक्षित पर्याय**

लिप बाम हे अनेक वर्षांपासून वापरलं जाणारं एक पारंपरिक उपाय आहे. यामध्ये बीजवॅक्स, शिया बटर, पेट्रोलियम जेली किंवा गायचं साजूक तूप अशा घटकांचा समावेश असतो. यामुळे लिप बाम हा एक जाडसर थर तयार करतो, जो कोरडेपणा, थंडी आणि वाऱ्यापासून ओठांना संरक्षण देतो. विशेषतः फाटलेले, जळजळीत किंवा त्रासदायक होठ असतील, तर लिप बाम त्यावर दाट संरक्षणात्मक थर देऊन नमी टिकवून ठेवतो. रात्री झोपण्याआधी लावल्यास हा परिणाम अधिक चांगला दिसतो.

**लिप ऑईल-सौंदर्यासाठी हायड्रेटिंग टच**

दुसरीकडे, लिप ऑईल हे एक आधुनिक, हलकं आणि सौंदर्यदृष्टीने आकर्षक पर्याय आहे. हे लिक्विड स्वरूपात असतं आणि यामध्ये नारळ तेल, जोजोबा ऑईल, बदाम तेल आणि व्हिटॅमिन ई यासारख्या घटकांचा समावेश असतो. लिप ऑईल हे फक्त बाहेरून थर देत नाही, तर आतूनही ओठांना नमी देतं आणि त्यांना मृदू आणि चमकदार बनवतं. विशेषतः दिवसा किंवा मेकअपच्या आधी वापरण्यासाठी हे खूप उपयुक्त ठरतं, कारण ते चिटचिटीत न वाटता एक नैसर्गिक ग्लॉसी फिनिश देतं.

खरंतर लिप बाम आणि लिप ऑईल दोघेही ओठांची देखभाल करण्यात प्रभावी आहेत. परंतु त्यांचा वापर आपल्याला आपल्या होठांच्या स्थितीच्या आधारे ठरवावा लागतो. दोन्हीचा संतुलित वापर करणेच हे तुमच्या सौंदर्याचे आणि आरोग्याचे रहस्य ठरू शकते.

# पक्षाचे कार्यालय न्यायमंदिर व्हावे -आमदार दरेकर

**माणगाव : प्रतिनिधी**

पक्षाचे कार्यालय न्यायमंदिर ठरून या कार्यालयातून नागरिकांची कामे झाली पाहिजेत, असे प्रतिपादन विधान परिषदेचे आमदार प्रवीण दरेकर यांनी माणगाव येथील कार्यक्रमात केले. भारतीय जनता पक्षाचे मध्यवर्ती कार्यालय वेदपाठक प्लाझा, तहसील कार्यालय शेजारी, माणगाव येथे सुरू करण्यात आले असून या कार्यालयाचा उद्घाटन सोहळा बुधवारी (दि. २३) दरेकर यांच्या हस्ते उत्साहात संपन्न झाला.




या कार्यक्रमास माजी आमदार शाम सावंत, भाजप नेते पंकज तांबे, ज्येष्ठ नेते संजय आप्पा ढवळे, राजेश मपारा, संजय पंदेरे, शरद कदम, चिन्मय मोने, युवराज मुंढे, विशाल पाशिलकर, गोविंद कासार, राजू मुंढे, स्वप्नील शिर्के, नागेंद्र राठोड, मंदार म्हामुणकर, सोनाली दसवते, ओमकार मिरगुळे, रुपेश वाढवळ, संभाजी गायकवाड यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला कार्यकर्त्या मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मार्गदर्शन करताना दरेकर म्हणाले की, पंकज तांबे हे काँग्रेसचे एक ज्येष्ठ पदाधिकारी होते. त्यांनी माझ्याकडे भाजप पक्षात येण्याचा मनोदय व्यक्त केला. त्यावेळी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत मुंबई येथे पंकज तांबे यांचा शेकडो कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत पक्षप्रवेश सोहळा उत्साहात झाला.

यानंतर पंकज तांबे यांनी माणगावमध्ये पक्षाचे मध्यवर्ती कार्यालय सुरू करण्याचा मनोदय व्यक्त करून आज माणगावात पक्षाचे कार्यालय त्यांच्या माध्यमातून सुरू होत आहे. या कार्यालयातून नागरिकांची कामे झाली पाहिजेत. महायुती सरकारच्या लोकाभिमुख योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचवून पक्ष संघटना अधिकाधिक बळकट करावी, असे सांगत पंकज तांबे व त्यांचे सहकारी चांगल्या प्रकारे पक्षाचे काम करतील, असे सांगत त्यांनी पक्षाच्या माणगाव कार्यालयाला शुभेच्छा दिल्या.

यावेळी प्रास्ताविकात बोलताना भाजप नेते पंकज तांबे म्हणाले की, दरेकर यांनी प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते मुंबई येथे माझा पक्षप्रवेश घेतला. तसेच आजच्या कार्यालयाच्या उद्घाटन कार्यक्रमालाही दरेकर उपस्थित राहिल्याने मी त्यांचे मनापासून ऋण व आभार व्यक्त करतो. माणगावात पक्ष कार्यालय असावे तसेच या कार्यालयातून लोकांची कामे करण्यासाठी हे कार्यालय आपण सुरू केले असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे औचित्य साधून दरेकर यांच्या हस्ते करुणा म्हामुणकर, राहुल गायकवाड, मयूर यादव, बबी गायकवाड, अनिकेत गायकवाड, दिनेश म्हसकर व सहकाऱ्यांनी भारतीय जनता पक्षात जाहीर प्रवेश केल्याचे भाजप नेते पंकज तांबे यांनी सांगितले.

# माणगावात ५ ऑक्टोबरला महसूल लोक अदालत

**माणगाव : प्रतिनिधी**



महसूल प्रशासनातील विविध अर्धन्यायिक प्रकरणे आणि प्रलंबित अपिलांचा जलद गतीने निपटारा करण्यासाठी माणगाव उपविभागात 'महात्मा जोतीराव फुले महसूल लोक अदालत अभियान' राबविण्यात येत आहे.

या अभियानांतर्गत माणगाव येथील उपविभागीय अधिकारी यांच्या न्यायालयात सोमवार ५ ऑक्टोबर तसेच सोमवार ७ डिसेंबर रोजी सकाळी ११ ते दुपारी २ या वेळेत विशेष सुनावणी घेण्यात येणार आहे, अशी माहिती उपविभागीय अधिकारी माणगाव यांनी प्रसिद्धीसाठी दिलेल्या पत्रकातून दिली.

महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाने १४ ऑगस्ट रोजी जारी केलेल्या शासन निर्णयानुसार राज्यभर १ सप्टेंबर २०२६ ते ३१ मार्च २०२७ या कालावधीत हे अभियान राबविण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. मंडळ अधिकारी, तहसीलदार, अपर तहसीलदार, शेतजमीन न्यायाधिकरण तसेच उपविभागीय अधिकारी यांच्या स्तरावर प्रलंबित असलेल्या अर्धन्यायिक दावे व अपिलांचा जलद निपटारा हा या अभियानाचा प्रमुख उद्देश आहे.

महसूल विषयक दावे दाखल झाल्यानंतर विविध कारणांमुळे अनेक प्रकरणे दीर्घकाळ प्रलंबित राहतात. त्यामुळे संबंधित पक्षकारांना वेळ, खर्च आणि न्यायालयीन प्रक्रियेचा अतिरिक्त भार सहन करावा लागतो. तडजोडीने अथवा उभय पक्षांच्या सहमतीने निकाली काढता येणाऱ्या प्रकरणांना या विशेष अभियानाच्या माध्यमातून जलदगतीने निर्णयाच्या टप्प्यावर आणण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

दरम्यान, अपर जिल्हाधिकारी, रायगड-अलिबाग यांनी २७ ऑगस्ट रोजीच्या आदेशान्वये माणगाव उपविभागीय अधिकारी यांच्या न्यायालयातील प्रलंबित अर्धन्यायिक प्रकरणांचा जलद निपटारा करण्यासाठी महसूल लोक अदालत आयोजित करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यानुसार माणगाव उपविभागीय अधिकारी यांच्या न्यायालयात या अभियानाचे आयोजन करण्यात आले आहे.

या पार्श्वभूमीवर माणगाव व तळा तालुक्यातील संबंधित विधिज्ञांनी तडजोडीने व सहमतीने निकाली निघण्याची शक्यता असलेल्या प्रकरणांची माहिती, उभय पक्षकारांची नावे तसेच दावा क्रमांक आणि आवश्यक तपशील २८ सप्टेंबरपूर्वी उपविभागीय अधिकारी कार्यालयाकडे सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# रोह्यात जोरदार पाऊस

**रोहा : प्रतिनिधी**

ऐन गणेशोत्सवाच्या दरम्यान बुधवारी सायंकाळी रोहा शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात पावसाने जोरदार हजेरी लावली. सकाळपासून ऊन पडले असताना बुधवारी सायंकाळी ४ वाजता अंधारून जोरदार पाऊस रोहा शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागात पडला. सकाळपासून नागरिक उकाड्याने हैराण असताना सायंकाळी आलेल्या पावसामुळे नागरिकांना दिलासा मिळाला.

जोरदार पावसामुळे काही काळ वीजही खंडित झाली होती. सर्वत्र गणेशोत्सवाची रेलचेल आहे. गणेशोत्सवानिमित्त विविध कार्यक्रम, पूजा वगैरे सर्वत्र चालू असताना पावसाने जोरदार हजेरी लावल्यामुळे काही काळ गणेशभक्तांचा हिरमोड झाला. हवेत गारवा निर्माण झाला असून आलेला पाऊस भातशेतीला उपयुक्त ठरणार आहे. बाजारातील व्यापाऱ्यांची मात्र काही काळ तारांबळ उडाली.



# केंबुर्लीत अवैध विदेशी मद्यसाठा जप्त

**महाड : रामप्रहर वृत्त**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावरील मौजे केंबुर्ली येथे हॉटेल निसर्गासमोर सापळा रचून टाटा कंपनीचा बाराचाकी ट्रक क्र. आरजे-१९-जीई-४११५ अडवून तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान या वाहनात महाराष्ट्र राज्यात विक्रीस प्रतिबंधित असलेला गोवा राज्य बनावटीचा रॉयल ब्लू माल्ट व्हिस्की या विदेशी मद्याच्या १८० मिली क्षमतेच्या सीलबंद बाटल्यांचे एकूण १४८० बॉक्स अवैध मद्यसाठा जप्त करण्यात आला. ही माहिती अधीक्षक, उत्पादन शुल्क, रायगड कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

अधीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, रायगड यांना मिळालेल्या खात्रीलायक बातमीनुसार २१ सप्टेंबर रोजी ही कारवाई करण्यात आली. या कारवाईत १ कोटी ४९ लाख १८ हजार ४०० रुपये किमतीचा विदेशी मद्यसाठा, १० लाख रुपये किमतीचा बाराचाकी ट्रक व ८ हजार रुपये किमतीचा मोबाईल फोन, असा एकूण १ कोटी ५९ लाख २६ हजार ४०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी वाहनचालक प्रभुलाल भंवरलाल साळवी (३५, रा. भिलवाडा, राजस्थान) यास अटक करण्यात आली आहे. आरोपीविरुद्ध निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, महाड विभाग येथे गु.र.क्र. १६९/२०२६ अन्वये महाराष्ट्र दारूबंदी कायदा, १९४९ चे कलम ६५(अ)(ई), ८१, ८३, ९० व १०३ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

कारवाई आयुक्त राजेश देशमुख, सहआयुक्त प्रसाद सुर्वे व विभागीय उपआयुक्त प्रदीप पवार यांच्या निर्देशानुसार तसेच अधीक्षक आदित्य पवार व उपअधीक्षक संतोष जगदाळे यांच्या मार्गदर्शनाखाली निरीक्षक संजय भोसले, दुय्यम निरीक्षक पिसाळ, जवान मनोज गायकवाड, निमिष नाईक, पोटे व रचना मोहिते यांनी पार पाडली असून, पुढील तपास दुय्यम निरीक्षक पिसाळ करीत आहेत.

गोवा राज्य बनावटीचे अथवा अन्य परराज्यातील अवैध मद्य, बनावट मद्य, कर चुकवून विक्री होत असलेले मद्य तसेच हातभट्टी दारूची निर्मिती, वाहतूक अथवा विक्री होत असल्याची माहिती असल्यास राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या टोल फ्री क्र. १८००-२३३-९९९९ अथवा व्हॉट्सअ‍ॅप क्र. ८४२२००११३३ वर संपर्क साधावा.

# राज्यस्तरीय निबंध स्पर्धेत ॲड. प्रतिभा पोतदार सर्वप्रथम

**कर्जत : प्रतिनिधी**

भारतीय लोक प्रशासन संस्था (आयआयपीए), महाराष्ट्र विभागीय शाखेतर्फे माजी सनदी अधिकारी स्व. बी. जी. देशमुख यांच्या स्मरणार्थ २०२५-२६ या वर्षासाठी घेण्यात आलेल्या वार्षिक राज्यस्तरीय निबंध स्पर्धेत कर्जतच्या अभिनव ज्ञान मंदिर प्रशालेच्या सेवानिवृत्त शिक्षिका ॲड. प्रतिभा सुधीर पोतदार यांच्या 'कृत्रिम बुद्धिमत्तेचे युग' या विषयावरील निबंधाला प्रथम क्रमांक मिळाला.



या स्पर्धेत ३८० स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. ही स्पर्धा मराठी आणि इंग्रजी या दोन्ही भाषांमध्ये खुली असून दरवर्षी पदव्युत्तर दर्जाच्या, विश्लेषणात्मक आणि संशोधनपर निबंधांसाठी आयोजित करण्यात येते. या स्पर्धेत प्रा. राजेंद्र ठोंबरे (सांगोला) यांच्या 'सोशल मीडिया : आव्हाने आणि संधी' या निबंधाला द्वितीय क्रमांक, योगंधरा बधे (तळेगाव दाभाडे) यांच्या 'सोशल मीडिया : आव्हाने आणि संधी' या निबंधाला तृतीय क्रमांक मिळाला. तसेच डॉ. शिल्पा जोशी (छत्रपती संभाजीनगर) यांच्या 'कृत्रिम बुद्धिमत्तेचे युग' या निबंधाला उत्तेजनार्थ पारितोषिक मिळाले.

मंत्रालयातील मुंबई येथील परिषद सभागृहामध्ये संपन्न झालेल्या पारितोषिक वितरण कार्यक्रमात संस्थेचे अध्यक्ष सेवानिवृत्त आयएएस अधिकारी स्वाधीन क्षत्रिय यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले. याप्रसंगी व्यासपीठावर सचिव डॉ. सतबिर सिंग, कोषाध्यक्ष विकास देवधर, कार्यान्वयी संयुक्त सचिव जयराज चौधरी, विशेष कर्तव्य अधिकारी शशांक बर्वे आदी उपस्थित होते.मुख्य सचिव राजेश अग्रवाल तसेच विविध खात्यांच्या आयएएस अधिकाऱ्यांनी दूरदृश्य प्रणालीद्वारे कार्यक्रमात सहभागी होऊन पारितोषिक विजेत्यांचे अभिनंदन केले. यावेळी सुधीर पोतदार, मैत्रेयी पोतदार, नीलम पेडणेकर, योगिनी गावडे, मिलिंद साबळे आदी उपस्थित होते.

**पनवेल महानगरपालिका**
तालुका - पनवेल, जिल्हा - रायगड
**जाहीर नोटीस सूचना**

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन उक्त अधिनियम कलम ८(३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की,

| अ.क्र. | अर्जदाराचे नाव व पत्ता | बाधित झाडांची संख्या | झाडे तोडण्याचे कारण व ठिकाण |
|---|---|---|---|
| १ | अमोघ प्रशांत ठाकूर, प्लॉट नं.५८अ, मिडलक्लास हौ. सो. पनवेल, जि. रायगड | ०१ आंबा व ०१ नारळ अशी एकूण ०२ झाडे तोडणे | **पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्लॉट नं.१००, फायनल प्लॉट नं.२०५/४८, मिडलक्लास हौ. सो. पनवेल, जि. रायगड या भूखंडाच्या आवारातील ०२ झाडे नवीन इमारतीचे बांधकाम करणेस बाधित होत आहेत.** |

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिध्द झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात योग्य त्या कागदपत्रांसह पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण व उद्यान विभागामध्ये सादर कराव्यात. मूदतीत हरकती न आल्यास सदरची झाडे तोडणी करणेस वरील अधिनियमानुसार सशर्त परवानगी देणेबाबत पुढील कार्यवाही करण्यास येईल, याची नोंद घ्यावी.

दिनांक :२३ /०९/२०२६
जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२६/प्र.क्र.३१०/३३२/२०२६

**सही /-**
**उपायुक्त तथा वृक्ष अधिकारी**
पनवेल महानगरपालिका

**पनवेल महानगरपालिका**
तालुका - पनवेल, जिल्हा - रायगड
**पर्यावरण विभाग**

"पनवेल महानगरपालिका हद्दीतील नोंदणीकृत बांधकामांच्या ठिकाणी स्थापित करण्यात आलेल्या Air Quality Monitoring Display Board करिता "PMC AQI Central Monitoring Dashboard" विकसित व कार्यान्वित करणे तसेच सदरच्या Dashboard चे २ वर्ष कालावधीकरिता व्यवस्थापन आणि देखभाल करणेकामी त्रयस्थ संस्था नेमणूक करणेबाबत." याकरिता आर्थिक खर्चाचे अंदाजपत्रक तयार करणेकामी नोंदणीकृत व अनुभवी संस्थांकडून जाहीर सूचनेद्वारे बाजारभावाची दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

सदरची माहिती panvelcorporation.maharashtra.gov.in या वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आली आहे.

जा.क्र. पमपा/जनसंपर्क/३१२६/
प्र.क्र.३०७/३२९/२०२६
दिनांकः- २३/०९/२०२६

**सही /-**
**उपायुक्त ( पर्यावरण)**
पनवेल महानगरपालिका

# रोहा महिला उद्योग संस्थेची वार्षिक सभा

**रोहा : प्रतिनिधी**

रोहा महिला उद्योग सह. संस्थेची सन २०२५-२६ ची वार्षिक सर्वसाधारण सभा अध्यक्षा उषा क्षीरसागर यांच्या अध्यक्षतेखाली उद्योग समितीच्या हॉलमध्ये २२ सप्टेंबर रोजी पार पडली. सभेला उषा क्षीरसागर यांच्यासह निता हजारे, राजश्री देसाई, नेहा कुळकर्णी, विजया कोठारी, कविता दळवी, माधवी दाते, ज्योती सुनीलकुमार, सरोजिनी शिंदे यांसह सुमारे ५० भगिनी सदस्य उपस्थित होत्या.

सभेच्या सुरुवातीला निता हजारे यांनी प्रास्ताविक केले. राजश्री देसाई यांनी अहवाल वाचन केले. अध्यक्षा उषा क्षीरसागर यांनी ऑडिट रिपोर्टचे वाचन केले. नेहा कुळकर्णी आणि कविता दळवी यांनी शेअर्स डिव्हिडंडचे वाटप केले. बामणे, ज्योती सुनीलकुमार, शिंदे, कोठारी यांनी अल्पोपहाराचे कामकाज पाहिले व निता हजारे यांनी सर्व सभासद भगिनींचे आभार मानून सभेची सांगता केली. या संस्थेला बी ग्रेड मिळाले आहे. या महिला उद्योग सह. संस्थेत निरनिराळ्या सणांसाठी लागणारे चकली, थालीपीठ भाजणी, तिळगूळ व अन्य भेसळ नसलेले पदार्थ वाजवी दरात विक्री केले जातात.



**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

मुदतवाढ सूचना क्र. २

**ई निविदा सूचना क्र.२३ /२०२६-२०२७ (मुंबई) करीता**

दिनांक ०९/०७/२०२६ रोजी दैनिक नवाकाळ, मुंबई, दैनिक हिंदूस्थान टाईम्स, मुंबई , दैनिक फ्रिप्रेस जरनल, मुंबई, दैनिक प्रातःकाल, मुंबई, दैनिक भास्कर, मुंबई, दैनिक रामप्रहर, रायगड , दैनिक सागर, ठाणे या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या वरील ई निविदा सूचनेतील खालील कामाकरीता ई निविदा शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्याबाबत व कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण / महामंडळाचा खुलासा उपलब्धतेबाबत मुदतवाढ सूचना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचेनांव | अंदाजितरक्कम |
|---|---|---|
| १ | रानसई पाणीपुरवठा योजना.. रानसई धरणाच्या ओव्हरफ्लो विभागाची विशेष दुरुस्ती करणे, ऊर्जा क्षय व्यवस्था, गाईड भिंत बांधणे, रानसई धरणाच्या ड्रेनेज पाइपलाइन स्थलांतरीत करणे व विस्तार करणे. | ₹ २४,८०,००,५०१.०० |

उपरोक्त कामांकरीता निविदा प्रपत्र दिनांक १४/१०/२०२६ पर्यंत शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक ०५/१०/२०२६ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

ज्या निविदाधारकांनी यापूर्वी आपली निविदा भरली असेल अथवा अपलोड केली असेल, त्यांनी निविदेमध्ये बदल करुन किंवा बदल न करता सदर निविदा पुन्हा भरणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी, अशा कंत्राटदारांनी शुद्धिपत्रकानंतर जर निविदा पुन्हा भरली नाही अथवा अपलोड केली नाही तर त्यांचा देकार सदर स्पर्धात्मक निविदेतून आपोआप बाद होईल.

सदर निविदा सूचनेत इतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

**जाहीर नोटीस**

तमाम लोकास या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येत आहे की खालील परिशिष्टात नमूद केलेली शेतजमिन मिळकत ही मालक **श्री. दिनेश नारायण म्हात्रे** यांच्याकडून कायमस्वरूपी विकत घेण्याबाबतचा व्यवहार आमचे अशील यांनी ठरवलेला आहे व या व्यवहारा संदर्भात जाहीर नोटीस वर्तमानपत्रात देण्याबाबत विद्यमान मालक **श्री. दिनेश नारायण म्हात्रे** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या आशिलांच्या सांगण्यावरून ही वर्तमानपत्रात जाहीर नोटीस देत आहेत.

**मिळकतीचे वर्णन-: मौजे खारसापोली (५५३८९३)**
**ULPIN: १०७७९५६४३३७२, तालुका- पेण, जिल्हा-रायगड**

| गट क्रमांक | भुधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| १८/१/ क/१ खाते क्रमांक ५५७ | १ | ०.१२.५० पो.ख ०.०२.३० **एकूण क्षेत्र ०.१४.८०** | २.९७ |

या एकूण विक्री क्षेत्राचे ०.१४.८०

वर नमूद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तीच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षीस, खरेदीखत, साठे करार, मिळकत विकसित करणे बाबतचा करार, कुळ हक्क, वारसाहक्क वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा पोटगी, मृत्युपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क इ. संबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्का बाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्या सह खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **१४ दिवसांच्या** आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपली लेखी हरकत व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क व हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत व सदर मिळकत निर्वेध आहे असे गृहीत धरून आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतिनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्या हरकती व आक्षेप आमच्या आशीलांवर बंधनकारक असणार नाही त्याची नोंद घ्यावी.

दिनांक : २३ सप्टेंबर २०२६

**सही**
**ॲड. निलेश झंजाड**
बी १०४ सफायर सी.एच.एस.लि., सेक्टर २२, भूखंड क्रमांक ३३/३४, कामोठे - ता. पनवेल, जि. रायगड.
बि. सं. क्र. ९९२०४७५८०१

# संकटकाळात शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी : कृषिमंत्री भरणे

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

कोकणातील पावसाच्या खंडामुळे भात, नाचणीसह खरीप पिकांवर झालेला परिणाम लक्षात घेऊन अधिकाऱ्यांनी केवळ आकडेवारीच्या आधारे परिस्थितीचे मूल्यांकन न करता प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन वस्तुनिष्ठ माहिती संकलित करावी. पीकविमा, एनडीआरएफ आणि शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मदत मिळवून देण्यासाठी सर्व यंत्रणांनी अधिक सक्रियपणे काम करावे, असे निर्देश कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिले आहेत.



सीबीडी बेलापूर येथील सिडको सभागृहात कोकण विभागातील पीक परिस्थितीबाबत आयोजित आढावा बैठकीत भरणे बोलत होते. बैठकीस फलोत्पादन, रोजगार हमी योजना मंत्री तथा रायगडचे पालकमंत्री भरत गोगावले, मत्स्यव्यवसाय मंत्री तथा सिंधुदुर्गचे पालकमंत्री नितेश राणे, आमदार मंदा म्हात्रे, आमदार सुलभा गायकवाड, आमदार दीपक केसरकर, रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, कृषी सभापती वैकुंठ पाटील, कृषी सचिव परिमल सिंह, कृषी आयुक्त सुरज मांढरे, विभागीय आयुक्त रुबल अग्रवाल, विभागीय कृषी सहसंचालक बालाजी ताटे, सर्व जिल्हाधिकारी, सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, सर्व जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी उपस्थित होते.

दूरदृश्य प्रणालीद्वारे आमदार निलेश राणे, आमदार शेखर निकम यांसह विविध लोकप्रतिनिधी उपस्थित होते.भरणे म्हणाले की, प्रत्येक शेतकरी व त्याच्या कुटुंबाचे संपूर्ण वर्षाचे आर्थिक गणित शेतीशी जोडलेले आहे, ही बाब लक्षात घेऊन अधिकारी–कर्मचाऱ्यांनी प्रत्यक्ष क्षेत्रावर जाऊन परिस्थितीची पाहणी करावी. महसूल, कृषी आणि संबंधित सर्व विभागांच्या अधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेऊन त्यानुसार आवश्यक मदत उपलब्ध करून द्यावी. दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या निर्देशानुसार नुकसानीचे पंचनामे व क्षेत्रीय स्तरावरील वस्तुनिष्ठ माहिती संकलित करण्याची कार्यवाही तातडीने करावी.

पिकांची प्रत्यक्ष स्थिती, पावसातील खंड आणि त्याचा पिकांवर झालेला परिणाम याची अचूक नोंद करून पुढील मदतीसाठी आवश्यक प्रस्ताव तयार करावेत. पीकविमा घेतलेल्या शेतकऱ्यांना नुकसानभरपाईचा लाभ वेळेत मिळण्यासाठी पीक कापणी प्रयोग आणि त्यासंबंधीची कार्यवाही पीक परिस्थितीनुसार तातडीने पूर्ण करावी. पीकविम्याच्या माध्यमातून जास्तीत जास्त मदत शेतकऱ्यांपर्यंत पोहचविण्यासाठी कृषी विभागाने आवश्यक ती कार्यवाही करावी. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना एनडीआरएफ तसेच शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून उपलब्ध होणारी मदत वेळेत मिळवून देण्यासाठी प्रशासनाने कार्यवाही करावी. योजनांची माहिती पात्र शेतकऱ्यापर्यंत पोहोचवून लाभ मिळेल याची दक्षता घ्यावी, असे निर्देश त्यांनी दिले.

पिण्याच्या पाण्याची उपलब्धता व जनावरांच्या चारा प्रश्नाकडेही प्रशासनाने गांभीर्याने लक्ष द्यावे. पाणी व चारा देण्यासाठी संबंधित यंत्रणांनी नियोजन करावे, असे भरणे यांनी सांगितले. लोकप्रतिनिधींनी मतदारसंघातील शेतकऱ्यांच्या अडचणी मांडल्या. पिकांचे नुकसान, पावसातील खंड, पीकविमा, शासनाच्या विविध योजनांच्या लाभाबाबत केलेल्या सूचनांची, त्यांनी मांडलेल्या क्षेत्रीय समस्यांची दखल घेऊन त्यावर कार्यवाही करावी, अशा सूचना कृषिमंत्री भरणे यांनी दिल्या.



# पनवेल मनपा कर्मचाऱ्यांच्या अनुदानासाठी महापौरांना निवेदन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेतील सर्व कामगार, कर्मचारी, अधिकाऱ्यांना शिक्षण मंडळासह २०२६चे दिवाळी सणापूर्वी ४० हजार रुपये सानुग्रह अनुदान देण्यात यावे, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली. २३ सप्टेंबरला महापौर नितीन पाटील यांना हे निवेदन देण्यात आले.

यावेळी युनियनचे सरचिटणीस अनिल जाधव, कोषाध्यक्ष दत्तगुरू म्हात्रे, उपाध्यक्ष संजय जाधव, विनायक बारसे, मनोज कांबळे, रवींद्र गायकवाड, कैलाश जाधव, अरुण कांबळे, भगवान राजपूत, प्रफुल्ल घरत, सन्नी बैद, वासिम पटेल, धोंडी बागडी, हर्ष बहिरा उपस्थित होते. याबाबत निर्णय घेतला जाईल, असे आश्वासन महापौर नितीन पाटील यांनी निवेदन स्वीकारल्यानंतर दिले.

# 'नवी मुंबईचा राजा'च्या दर्शनासाठी अलोट गर्दी



**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबईतील पहिला मानाचा सार्वजनिक गणेशोत्सव म्हणून लौकिक प्राप्त केलेल्या आणि आपल्या उच्च सांस्कृतिक परंपरांसाठी ओळखल्या जाणाऱ्या नवी मुंबईचा राजा (शिवछाया मित्र मंडळ) गणेशोत्सवाने यंदा ५६व्या वर्षीही रसिक व भाविकांच्या मनावर राज्य केले आहे. राजस्थानच्या ऐतिहासिक सिटी पॅलेसच्या साक्षीने विघ्नहर्त्याचे दर्शन घेण्यासाठी अक्षरशः भाविकांची अलोट गर्दी उसळली असून विविध क्षेत्रातील दिग्गज मान्यवरांनी हजेरी लावून नवी मुंबईचा राजाचे मनोभावे दर्शन घेतले. बाप्पाच्या दर्शनासाठी उसळलेल्या अलोट गर्दीमुळे संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.

मंडळाने यंदा कला व समाजकारणाचा अनोखा संगम साधला असून अमली पदार्थांच्या सेवनामुळे शरीराला होणारा भीषण धोका आणि त्यामुळे उद्ध्वस्त होणारा हसता–खेळता परिवार या गंभीर विषयावर गणेशभक्तांमध्ये व्यापक जनजागृती केली आहे. २४ सप्टेंबर रोजी सायंकाळी सत्यनारायण महापूजेचे आयोजन करण्यात आले असून त्यानंतर लहानथोरांना पर्वणी ठरावी यासाठी आकर्षक फन फेअरचे आयोजन करण्यात आले आहे. गणेशभक्तांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन शिवछाया मित्र मंडळाचे अध्यक्ष पत्रकार अंकुश वैती यांनी केले आहे.

# ऐरोली विपश्यना केंद्रात चोरी; सव्वादोन लाखांचा ऐवज लंपास

**नवी मुंबई : बातमीदार**

ऐरोली येथील सेक्टर ६ मधील नालंदा विपश्यना केंद्रात (बुद्ध विहार प्रार्थना केंद्र) अज्ञात चोरट्याने दानपेटीतील रोकडसह एकूण दोन लाख १३ हजार रुपयांचा ऐवज लांबवल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी रबाळे पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार रविवारी सकाळी सहा वाजण्याच्या दरम्यान ही चोरीची घटना घडली. अज्ञात चोरट्याने नालंदा विपश्यना केंद्रात बेकायदेशीरपणे प्रवेश करून तेथील दानपेटी फोडली आणि त्यातील सुमारे दोन लाख रुपयांची रोकड चोरून नेली. तसेच प्रार्थना केंद्राला लागूनच असलेल्या किचनची तोडफोड करून ड्रॉवरमध्ये ठेवलेल्या लेडीज आणि जेंट्स पर्समधील अनुक्रमे २,५०० रुपये व १०,५०० रुपये अशी रोकडही चोरून नेली.

दुसऱ्या दिवशी सकाळी सहा वाजता घटना उघडकीस आल्यानंतर फिर्यादी शशिकांत अहिरे (४६, रा. ऐरोली) यांनी रबाळे पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली. रबाळे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून वरिष्ठ पोलीस निरीक्षक बाळकृष्ण सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक पोलीस निरीक्षक अविनाश पालदे, सहाय्यक पोलीस निरीक्षक सुरज जाधव व पोलीस पथकाकडून पुढील तपास सुरू आहे. फॉरेन्सिक टीमनेही पुरावे गोळा केले आहेत.

# जॉय सिटी मित्र मंडळाला स्वयंपाकाची भांडी भेट

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शेडुंग येथील जॉय सिटी येथील मित्र मंडळाच्या विविध सामाजिक व सामुदायिक उपक्रमांना हातभार लागावा तसेच नागरिकांच्या सामूहिक कार्यक्रमांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध व्हाव्यात, या उद्देशाने पंचायत समिती सदस्य योगिता लहाने व युवा कार्यकर्ते अविनाश खेत्री यांच्या वतीने स्वयंपाकाची आवश्यक भांडी भेट देण्यात आली.



जॉय सिटी मित्र मंडळाच्या माध्यमातून परिसरात विविध सामाजिक, धार्मिक तसेच नागरिकांच्या हिताचे उपक्रम राबविले जातात. या उपक्रमांमध्ये सामूहिक जेवणाची व्यवस्था करताना स्वयंपाकाची भांडी आवश्यक असल्याने योगिता लहाने व अविनाश खेत्री यांनी पुढाकार घेत मंडळाला आवश्यक साहित्य उपलब्ध करून दिले. या माध्यमातून सामाजिक बांधिलकी जपत नागरिकांच्या गरजा लक्षात घेऊन प्रत्यक्ष उपयोगी पडणारे साहित्य उपलब्ध करून देण्यात आले आहे. सामाजिक कार्य करताना केवळ आर्थिक मदतीपुरते मर्यादित न राहता नागरिकांच्या दैनंदिन व सामुदायिक गरजांसाठी आवश्यक साधनसामग्री उपलब्ध करून देणे हीदेखील समाजसेवेची महत्त्वाची बाब असल्याचे या उपक्रमातून अधोरेखित झाले.

जॉय सिटी मित्र मंडळाच्या वतीने या सहकार्याबद्दल योगिता लहाने आणि अविनाश खेत्री यांचे मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.







पनवेल : भाजप राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, पंचायत समितीचे उपसभापती भूपेंद्र पाटील आणि महापालिका प्रभाग समिती 'ड'चे सभापती अजय बहिरा यांनी भाजप युवा मोर्चा पनवेल तालुका पूर्व मंडळ अध्यक्ष विश्वजीत पाटील यांच्या घरी विराजमान गणरायाचे दर्शन घेतले.





पनवेल : भाजप राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत आणि पंचायत समितीचे उपसभापती भूपेंद्र पाटील यांनी रमेश पाटील (चिंचवली) आणि सुरज भोईर (खिडुकपाडा) यांच्या घरी विराजमान गणरायाचे दर्शन घेतले. सोबत सुनील पाटील, सागर मढवी, भालचंद्र भोपी.



सहयोग गणेश मित्र मंडळ, नवीन पनवेल



आदर्श युवा मित्र मंडळ, से. ४, अध्यक्ष नागेश केसकर, उपाध्यक्ष बबन बारगजे, सचिव आशिष फुटाणे, खजिनदार प्रशांत देवकर





पनवेल तालुका पोलीस ठाण्यातील गणपती बाप्पा; सोबत अधिकारी आणि कर्मचारी.



ढालपे न्यूज पेपर सर्व्हिस, नवीन पनवेल

# निर्माल्य संकलनातून होणार खतनिर्मिती

## पर्यावरण रक्षणासाठी प्रशासनासह सामाजिक संस्थांचा पुढाकार

**पाली : प्रतिनिधी**

पर्यावरणस्नेही गणेशोत्सवासाठी जिल्ह्यात विविध ठिकाणी पुढाकार घेण्यात आला आहे. बाप्पाला निरोप देताना जलप्रदूषण रोखण्यासाठी आणि निसर्गाचे संतुलन राखण्यासाठी जिल्हा प्रशासनासह अनेक सामाजिक संस्था आणि नागरिक एकत्र आले आहेत. गौरी-गणपती विसर्जनाच्या वेळी विसर्जन घाटांवर मोठ्या प्रमाणावर जमा होणाऱ्या निर्माल्याचे योग्य व्यवस्थापन करण्यासाठी विशेष मोहीम राबवली जात आहे.



जिल्हा परिषदेमार्फत सर्व ग्रामपंचायतींना विसर्जन घाटाजवळ निर्माल्य कलश ठेवण्याचे व कृत्रिम तलाव बनवण्याचे पत्र पाठवण्यात आले होते. त्या अनुषंगाने बहुतांश ग्रामपंचायतींनी कलश ठेवून त्यामध्ये निर्माल्य गोळा केले. या निर्माल्यातून खत निर्मिती करण्यात येणार आहे. गावखेड्यांपासून ते शहरांतील प्रमुख विसर्जन घाटांपर्यंत ठिकठिकाणी निर्माल्य कलश उभारण्यात आले होते. गणेशमूर्ती आणि गौरी विसर्जनप्रसंगी अर्पित केले जाणारे हार, फुले, दुर्वा, फळे यांसारखे नैसर्गिक व जैविक विघटन होणारे घटक एका बाजूला जमा केले जात आहेतल तर दुसरीकडे साडी, मुखवटे, प्लास्टिकचे आणि थर्माकोलचे सजावटी साहित्य तसेच इतर अविघटनशील वस्तू विलग करण्यात येणार आहेत.

नागरिकांमध्ये झालेल्या व्यापक जनजागृतीमुळे अनेक भाविकांनी स्वतःहून पुढे येत निर्माल्य थेट पाण्यात न टाकता या निर्माल्य कलशांमध्ये जमा केले. यामुळे नदी, तलाव आणि समुद्राच्या पाण्याचे होणारे प्रदूषण रोखण्यास मोठी मदत झाली असून जलचरांचे आयुष्य सुरक्षित राहण्यास हातभार लागला आहे. स्वयंसेवकांच्या टीमकडून हे जमा झालेले निर्माल्य वर्गीकरणासाठी संकलित केले जात आहे.ागील वर्षी राबवलेल्या अशाच उपक्रमातून रोहा आणि परिसरातील ३५ गावांमधून सुमारे १० टन निर्माल्य आणि साडेतीन टन प्लास्टिक जमा करण्यात आले होते. त्या निर्मल्यापासून सेंद्रिय खत तयार करून ते पुन्हा गावांमध्ये मोफत वाटण्यात आले होते, तर प्लास्टिक रिसायकलिंगसाठी पाठवण्यात आले होते. पाली नगरपंचायत व बल्लाळेश्वर देवस्थान यांच्या वतीनेही निर्माल्याचे खत बनवण्याचा उपक्रम मागील वर्षी झाला. यावर्षीदेखील उपक्रम राबवण्यात येणार आहे.

**राजिप, स्थानिक लोकप्रतिनिधी, अधिकारी, स्वयंसेवी संघटना व नागरिक यांच्या पुढाकाराने निर्मल श्री गणेश उत्सवानिमित्त विविध उपक्रम राबवले जात असून पर्यावरणपूरक गणेशोत्सव ही आता लोक चळवळ बनत चालली आहे. यासाठी काही ठिकाणी इकोफ्रेंडली गणेशोत्सव स्पर्धा आणि कार्यशाळा घेण्यात आली. सर्व ग्रामपंचायतींना निर्माल्य कलश ठेवण्याचे व कृत्रिम तलाव बनवण्याचे पत्र देण्यात आले. त्याला चांगला प्रतिसाद मिळाला.**

**-जयवंत गायकवाड,** जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक, राजिप

**जिल्ह्यातील विविध ठिकाणी निर्माल्य कलशांत निर्माल्य गोळा करण्यात आले आहे. त्यासाठी स्थानिक प्रशासन, स्वयंसेवी संघटना आणि सुज्ञ नागरिकांनी पुढाकार घेतला. मागील वर्षी आम्ही हा उपक्रम राबवून निर्मल्यापासून कित्येक टन खत बनवले. हे खत शेतकरी आणि नागरिकांना मोफत वाटप केले होते. यावर्षीही खत बनवण्यात येईल.**

**-सागर दहिंबेकर,** जीवरक्षक व पर्यावरण अभ्यासक

---

## विनातिकीट रेल्वे प्रवाशांकडून दंड वसूल

**रोहा : प्रतिनिधी**

सुरक्षित, सुलभ आणि सन्मानजनक प्रवासाची खात्री करण्याच्या आपल्या कटिबद्धतेनुसार मध्य रेल्वेने आपल्या संपूर्ण नेटवर्कवर अनधिकृत आणि विनातिकीट प्रवासाविरुद्धची कारवाई अधिक तीव्र केली आहे. किमान दंडाच्या रकमेत झालेली वाढ आणि तिकीट तपासणीच्या तीव्र मोहिमांमुळे आर्थिक वर्ष २०२६-२७मध्ये (ऑगस्ट २०२६पर्यंत) महत्त्वपूर्ण परिणाम दिसून आले आहेत.

एप्रिल ते ऑगस्ट या कालावधीत, मध्य रेल्वेच्या समर्पित तिकीट तपासणी पथकांनी विनातिकीट किंवा अयोग्य/अवैध प्रवास करणाऱ्या १८.०३ लाख प्रवाशांना पकडले आणि १४०.८१ कोटी रुपयांचा विक्रमी दंड वसूल केला. गेल्या वर्षी याच कालावधीत १७.१९ लाख प्रकरणे आणि १००.५० कोटी रुपयांचा दंड नोंदवला गेला होता. त्या तुलनेत यावर्षी प्रकरणांच्या संख्येत जवळपास ५% आणि उत्पन्नात ४०%पेक्षा जास्त वाढ झाली आहे.

ऑगस्ट महिन्यात मध्य रेल्वेच्या तिकीट तपासणी पथकांनी विनातिकीट किंवा अवैध तिकीट घेऊन प्रवास करणाऱ्या २.५७ लाख प्रवाशांना पकडले. ऑगस्ट २०२५मध्ये ही संख्या २.७६ लाख इतकी होती. ऑगस्ट २०२६मध्ये दंडापोटी १९.५० कोटी रुपये वसूल करण्यात आले; तर ऑगस्ट २०२५मध्ये ही रक्कम १३.७८ कोटी रुपये होती. यावरून दंड वसुलीच्या रकमेत ४१ टक्क्यांहून अधिक वाढ झाल्याचे दिसून येते.

वैध तिकिटाशिवाय प्रवास करणे हा रेल्वे कायद्यांतर्गत गुन्हा आहे आणि त्यासाठी दंडात्मक कारवाई केली जाते. विनातिकीट प्रवासामुळे रेल्वेच्या महसुलावरही परिणाम होतो. ते लक्षात घेता प्रवाशांनी गैरसोय आणि दंड टाळण्यासाठी योग्य आणि वैध तिकीट काढून सन्मानपूर्वक व जबाबदारीने प्रवास करावा. विनातिकीट प्रवासाबाबत रेल्वेचे धोरण झिरो टॉलरन्स (शून्य सहिष्णुता) आहे आणि प्रवाशांचा प्रवास सुखकर व सन्मानजनक असावा, यासाठी रेल्वे कटिबद्ध आहे. जबाबदारीने प्रवास करा, सन्मानाने प्रवास करा, असे आवाहन मध्य रेल्वेने केले आहे.

---

## मढाळी आदिवासीवाडीत गवंडी प्रशिक्षण



**पाली : प्रतिनिधी**

स्वदेस फाउंडेशन आणि कौशल्य विकास भागीदार लर्ननेट स्किल्स यांच्या संयुक्त विद्यमाने सुधागड तालुक्यातील मढाळी आदिवासीवाडी, शिळोशी कातकरवाडी, उसर ठाकूरवाडी मिळून २१ प्रशिक्षणार्थींना गवंडी प्रशिक्षण देण्यात येत आहे. ग्रामपंचायत शिळोशी येथे या ४५ दिवसीय गवंडी प्रशिक्षणाचा शुभारंभ करण्यात आला.

उद्घाटन समारंभास स्वदेस फाउंडेशनचे उपसंचालक तुषार इनामदार, उपमहाव्यवस्थापक नजीर शिकलगार, वरिष्ठ व्यवस्थापक शिवतेज ढऊळ, सहाय्यक व्यवस्थापक भीमराव भालेराव, वरिष्ठ समन्वयक किरण खेडेकर, लर्ननेटचे समन्वयक राहुल शिर्के, प्रशिक्षक प्रेम कुमार मेघवाल, गाव विकास समितीचे पदाधिकारी, ग्रामस्थ व प्रशिक्षणार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ग्रामीण भागातील युवकांना बांधकाम क्षेत्राचे शास्त्रोक्त व व्यावसायिक प्रशिक्षण देऊन त्यांना स्वयंरोजगार व रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. या प्रशिक्षणानंतर रोजगारासाठी जे स्थलांतर होत होते ते थांबण्यासाठी मदत होणार आहे.

---

## वडगाव येथील प्रशिक्षण केंद्रातून आंतरराष्ट्रीय कुस्तीपटू तयार होतील -खासदार सुनील तटकरे

**अलिबाग : प्रतिनिधी**

वाडगाव येथील कुस्ती प्रशिक्षण केंद्रातून उत्तमोत्तम तसेच आंतरराष्ट्रीय कुस्तीपटू तयार होतील, जे रायगडाचे नाव जागतिक स्तरावर पोहचवतील, असा विश्वास खासदार सुनील तटकरे यांनी व्यक्त केला.



अलिबाग तालुक्यातील वाडगाव ग्रामपंचायत हद्दीत प्रवेशद्वार, खासदार सुनील तटकरे कुस्ती प्रशिक्षण केंद्र आणि स्व. दिलीप आंग्रे सार्वजनिक व्यायामशाळेचे लोकार्पण खासदार तटकरे यांच्या हस्ते नुकतेच झाले. त्यावेळी ते बोलत होते.

कार्यक्रमास जिल्हा परिषद उपाध्यक्ष मधुकर पाटील, चारुहास मगर, जिल्हा परिषद प्रतोद अमित नाईक, सरचिटणीस प्रवीण ठाकूर, उपसरपंच जयेंद्र भगत, ग्रामस्थ, प्रेक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी खासदार तटकरे म्हणाले की, राष्ट्रवादीचे नेते शरद पवार, स्व. अजित पवार यांनी विविध खेळाच्या संघटनांची अध्यक्षपदे भूषवली. मी त्यांच्यासोबत काम केले आहे. त्यामुळे खेळाचा आणि आपला जवळचा संबंध आहे. खेळ आपल्याला बरंच काही शिकवतो मैदानातून सांघिक भावना, खिलाडूवृत्ती निर्माण होऊन क्रीडांगण तुमच्यातील व्यक्तिमत्व घडवते. त्यामुळे विविध खेळ खेळणे आवश्यक आहे.

---

## वावेघर येथे अनोळखी व्यक्तीचा मृतदेह आढळला

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी परिसरातील वावेघर गावच्या हद्दीत एका अनोळखी पुरुषाचा मृतदेह आढळून आला आहे. त्याच्या वारसांचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी नागरिकांना माहिती देण्याचे आवाहन केले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, वावेघर हद्दीतील खांदेशी गल्ली येथील धोराजी हार्डवेअर दुकानाच्या बाजूला एक पुरुष मृतावस्थेत आढळून आला. त्याचे वय अंदाजे ३५ ते ४० वर्षे असून बांधा अतिशय सडपातळ आहे. केस काळे असून चेहऱ्यावर दाढी खुंटलेली आहे. मानेवर लाल रंगाच्या आयकार्डची दोरी असून त्याने गडद राखाडी रंगाची हाफ पॅन्ट परिधान केलेली होती.

पोलिसांच्या प्राथमिक माहितीनुसार या व्यक्तीच्या डाव्या पायाला झालेल्या संसर्गामुळे सेप्टिक शॉक येऊन त्याचा मृत्यू झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी रसायनी पोलीस ठाण्यात अपमृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

---

## साखर गाव येथे युवासेना शाखेचे उद्घाटन

**पोलादपूर : प्रतिनिधी**

कामथेगोवेले विभागातील साखर गावात शिवसेनच्या युवासेना शाखेची स्थापना करण्यात आली. युवासेना कोअर कमिटी सदस्य विकास गोगावले यांच्या हस्ते शाखेच्या कार्यालयाचे उद्घाटन झाले.



स्वप्नील चोरगे यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या या शाखेच्या उद्घाटनप्रसंगी जिल्हा परिषद सदस्य डॉ.निलेश कुंभार, तालुका प्रमुख निलेश अहिरे, विभाग प्रमुख लक्ष्मण मोरे, नगरसेवक सिद्धेश शेठ, युवासेना तालुकाप्रमुख विक्रम भिलारे, माजी सभापती शैलेश सलागरे, निलेश कंक, विकास नलावडे, दीपक उतेकर आदी उपस्थित होते.

यावेळी विकासशेठ गोगावले यांनी मनोगतात, या शाखेच्या माध्यमातून जनतेची जास्तीत जास्त सेवा करण्याचा प्रयत्न करून नागरिकांच्या अडचणी सोडवण्यासाठी आम्ही तत्पर राहू, अशी ग्वाही दिली.

---

## कर्जतमध्ये विश्वशांती यात्रा

**कर्जत : प्रतिनिधी**

अखिल भारतीय आध्यात्मिक समितीच्या आयोजनातून कर्जतमध्ये विश्वशांती यात्रा काढण्यात आली. याद्वारे शांतता, एकता आणि सद्भावनेचा संदेश देण्यात आला.

मैत्र बोध परिवाराच्या सहकार्याने ही यात्रा नियोजनबद्ध झाली. 'आंतरिक शांतीतून विश्वशांती' या प्रेरणादायी विचारासह आयोजित या यात्रेने अंतर्मनातील शांततेचे महत्त्व अधोरेखित केले. शांततेची सुरुवात स्वतःपासून करून ती कुटुंब, समाज आणि संपूर्ण विश्वापर्यंत पोहचवण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

प्रेमावतार मैत्रेय दादाश्री यांच्या प्रेरणेतून साकारलेल्या या उपक्रमाने शांतता ही केवळ एक संकल्पना नसून प्रत्येक व्यक्तीने आपल्या विचारांतून आणि कृतीतून जोपासण्याची जीवनमूल्य असल्याची जाणीव करून दिली.

या यात्रेच्या माध्यमातून विविध पार्श्वभूमीतील नागरिकांना शांतता, प्रेम, करुणा आणि परस्पर सौहार्द या सार्वत्रिक मूल्यांशी जोडण्याचा प्रयत्न करण्यात आला. यात्रेचे एक महत्त्वपूर्ण वैशिष्ट्य म्हणजे विश्वशांती प्रार्थनेचा शुभारंभ, ज्यामुळे सामूहिक प्रार्थना, शांतता आणि मानवतेप्रती एकात्मतेचा संदेश अधिक दृढ झाला.




---

# रोहा बाजारपेठेत गावठी भाज्यांची आवक वाढली; आदिवासींना रोजगार



**रोहा : प्रतिनिधी**

रोहा बाजारपेठेत गावठी विशेषतः स्थानिकांनी कोणत्याही खताचा वापर न करता पिकवलेल्या भाज्या बाजारात मोठ्या प्रमाणात उपलब्ध झाल्या आहेत. या भाज्यांची मोठ्या प्रमाणात आवक वाढल्याने खवय्यांना चांगली व ताजी भाजी उपलब्ध होत आहे.

रोहा बाजारपेठेमध्ये उपलब्ध असलेल्या भाज्यांमध्ये काकडी, शिराळी, पडवळ, अळूची पाने, माठ, दुधी यांचा समावेश आहे. ही भाजी ताजी व टवटवीत असल्याने नागरिक ती खरेदी करताना दिसत आहेत. ही भाजी आर्थिकदृष्ट्या परवडणारी आहे. त्यामुळे सकाळी मोठ्या प्रमाणात रोहेकर भाजी खरेदीसाठी गर्दी करत असल्याचे पहावयास मिळते. दुपारपर्यंत बहुतांशी भाजी ही विकली जात आहे.

स्थानिक शेतकऱ्यांनी व आदिवासी बांधवांनी पिकवलेली काकडी ३० ते ५० रुपये किलो, शिराळी ५० ते ६० रु. किलो, कारली ५० ते ६० रु. किलो, दुधी नगानुसार किंमत आहे. घोसाळे ४० ते ६० रु. किलो, भेंडी ६० रु. किलो किमतीच्या आसपास आहे. माठ १० ते २० रु. जुडी, अळूची पाने २० ते ४० रु. जुडी सध्या बाजारात आहे. अन्य भाज्या थोड्याफार फरकाने ३० ते ५० रुपयांच्या आसपास किमतीमध्ये आहेत.

या भाज्या मोठ्या प्रमाणात आदिवासी बंधू-भगिनी विक्रीला आणत असल्याने त्यांना चांगला रोजगार मिळत आहे. सुरुवातीला आदिवासी मंडळी रानभाज्या बाजारपेठेत आणत होते. रानभाज्यांचा हंगाम संपल्यानंतर ते आपला परसबागेत व घराच्या सभोवताली पिकवलेल्या भाज्या बाजारात विक्रीला आणत आहेत. या भाज्या ताज्या व हिरव्यागार असून त्या पिकवण्यासाठी खत न वापरल्यामुळे भाज्या पौष्टिक आहेत. परिणामी या भाज्यांना मोठ्या प्रमाणात बाजारात मागणी आहे.

---

## केंद्रीय मंत्री रामदास आठवले, पालकमंत्री भरत गोगावले यांचा रविवारी पालीत सत्कार



**पाली : प्रतिनिधी**

केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री तथा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले)चे अध्यक्ष डॉ. रामदास आठवले यांच्या मंत्रिपदाला १० वर्षे पूर्ण झाल्याबद्दल सुधागड तालुका रिपाइंतर्फे २७ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता पाली येथील लिमये हॉलमध्ये भव्य सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी रायगड जिल्ह्याचे नवनियुक्त पालकमंत्री भरत गोगावले यांचाही सत्कार होणार असल्याचे बुधवारी (दि.२३) पाली येथे पत्रकार परिषदेत सांगण्यात आले.

यानिमित्त पाली शहरातून वाजत गाजत मिरवणूक निघणार असून कार्यक्रमाची जय्यत तयारी झाली असल्याची माहिती रिपाइंचे जिल्हासंपर्क प्रमुख तथा स्वागताध्यक्ष राहुल सोनावळे यांनी दिली.

प्रमुख वक्ते म्हणून आरपीआयच्या महिला अध्यक्ष सीमा आठवले, राष्ट्रीय सरचिटणीस अविनाश महातेकर, राज्य अध्यक्ष राजाभाऊ सरोदे, सरचिटणीस गौतम सोनावणे, राज्य महिला अध्यक्ष चंद्रकांता सोनकांबळे, महाराष्ट्र प्रदेश युवक अध्यक्ष पप्पू कागदे, पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष अशोक गायकवाड, मुंबई प्रदेश अध्यक्ष सिद्धार्थ कासारे, कोकण प्रदेश अध्यक्ष प्रकाश मोरे, रायगड जिल्हा अध्यक्ष नरेंद्र गायकवाड हे संबोधित करणार आहेत.

या सत्कार सोहळ्याला खासदार सुनील तटकरे, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार रविशेठ पाटील आमदार महेंद्र दळवी, आमदार महेंद्र थोरवे, आमदार अनिकेत तटकरे यांच्यासह अन्य मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

